CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

बीड वर्ष ३६ वे अंक ९ वा फोन २३०१०१ दिनांक ७ डिसेंबर २०२५ रविवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

# जिल्हा परिषदेची आचारसंहिता १५ डिसेंबर पासून ?
# शहरानंतर आता ग्रामीण भागात निवडणुकीचा धुराळा



बीड दि.६ (प्रतिनिधी):- न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे नगर पालिका निवडणुकीचे मतदान होऊनही निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे, परंतु त्या अगोदरच १५ डिसेंबरपासून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांची आचारसंहिता सुरु होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. राज्य निवडणूक विभागाने या निवडणुकीची तयारी सुरु केली असून शहरानंतर आता ग्रामीण भागात निवडणुकीचा धुराळा उडणार आहे. नगर पालिकेची आचारसंहिता अद्याप संपलेली नाही, त्यामुळे आता संपूर्ण जानेवारी महिना आचारसंहिता राहील. ग्रामीण भागातील इच्छुक उमेदवारांनी तयारीला सुरुवात केली असून गाठीभेटींचे सत्र वाढले आहे.

## बीड जि.प.ची स्थिती

बीड जिल्हा परिषदेमध्ये नव्या रचनेनुसार एकूण ६१ गट असून जवळपास १२२ पंचायत समिती गण आहेत. बीड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद हे सध्या अनुसूचित जातीच्या महिलेसाठी आरक्षित आहे. बीड जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघातील गट आणि गणाचे आरक्षण जाहीर झालेले आहे. मागच्या निवडणुकीच्या वेळी जिल्हा परिषद सदस्यांची संख्या ६० होती, ती आता ६१ झाली आहे.

ओबीसी आरक्षणाच्या कारणामुळे न्यायालयीन कचाट्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. मुदत संपुनही तीन-चार वर्ष झाले तरी निवडणुका झाल्या नाहीत. अखेर न्यायालयाने राज्य सरकारला कडक शब्दात सुनावल्यानंतर निवडणुकांचे प्रोग्राम जाहीर झाले. नगर पालिका निवडणुकीचे मतदान झालेले आहे. ही मतमोजणी २१ डिसेंबरला होणार पान २ वर

# ज्ञानराधा पतसंस्थेच्या आणखी २७ मालमत्ता जप्त

## कुटे, कुलकर्णी यांच्या छ.संभाजीनगर व बीड हद्दीतील मालमत्तांचा समावेश

बीड दि.६ ( प्रतिनिधी):- ज्यादा व्याजराचे अमिष दाखवून ४ लाख ठेविदारांना ३ हजार ७१५ कोटींचा गंडा घालणाऱ्या बीड येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट विरोधात आता कारवाईचा फास अधिक घट्ट केला जात आहे. यापूर्वी ८० मालमत्ता जप्त केल्यानंतर आता सोसायटीचा अध्यक्ष सुरेश कुटे, त्याची पत्नी अर्चना कुटे व उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी या तिघांच्या छत्रपती संभाजी नगर व बीड जिल्हा हद्दीतील आणखी २७ स्थावर मालमत्ता आणि ६ बँक खाते गोठविण्यात आले आहे. तपास यंत्रणांनी गृह विभागाला पाठविलेल्या एमपीआयडी (महाराष्ट्र ठेवीदारांचे आर्थिक संरक्षण अधिनियम) अहवालावर गृह विभागाने मान्यता दिली आहे.

बीड येथील कुटे ग्रुपवर दोन वर्षांपूर्वी प्राप्तीकर विभागाची धाड पडली होती. त्यानंतर सुरेश कुटे अध्यक्ष असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेट पतसंस्थेत ठेवी काढण्यासाठी ठेविदारांची एकच झुंबड उडाली होती. त्यामुळे पतसंस्थेचा आर्थिक गाडा गडगडला आणि एक एक करुन पतसंस्थेच्या सर्व शाखा बंद पडल्या. पतसंस्थेच्या बीडसह राज्याभरात एकूण ५२ शाखांचे जाळे होते. मात्र पतसंस्था बंद पडल्याने ठेविदार हवालदिल झाले. कुटे व पतसंस्थेच्या संचालकांवर गुन्हा नोंदीचे सत्र सुरु झाले. एकट्या बीड जिल्ह्यात ज्ञानराधा पतसंस्था प्रकरणी ६० ते ७० गुन्हे नोंद आहेत. सुरुवातीला आर्थिक गुन्हे शाखेने तपास करुन या प्रकरणात पतसंस्थेचा अध्यक्ष सुरेश कुटे, उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी व अन्य काही जणांना अटक केली होती. दरम्यान, आता या प्रकरणाचा तपास पान २ वर

# बिबट्याच्या हल्ल्यात गुडेवाडी- बीड सांगवी येथील गाय, बैल ठार

आष्टी दि.६ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील बीड सांगवी- गुडेवाडी येथे वास्तव्यास असलेले गरीब कुटुंब शेतकरी शहादेव साहेबराव गणगे



आपल्या शेतामध्ये सर्वे नंबर २५६ या शेतामध्ये जनावर चारत असताना अचानक बिबट्याने हल्ला चढवला. प्रथम गाईवर हल्ला केल्यानंतर बैलावरही हल्ला केल्याने दोन्हीही जनावरे जागीच ठार झाले .
बीड सांगवी, कणसेवाडी, गुडेवाडी ,वेताळवाडी, बाबी, दरेवाडी , शेतकरी बांधव बिबट्या या भागात फिरताना दिसत असल्याने भयभीत झाले आहेत. या भिती पोटी शेतकरी हा रात्री अपरात्री कांदा, गहु पिकांना पाणी देण्यासाठी कुणी धजावत नाही. त्यामुळे सर्वत्र भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. काल शुक्रवारी पान २ वर

# जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील कामे ठप्प

## विकासाला खीळ

## पालकमंत्र्यांनी दखल घेण्याची मागणी

बीड दि.५ (प्रतिनिधी) :- जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे सर्व कामे ठप्प आहेत. निधीची उपलब्धता नाही, त्यामुळे सर्व कामे थांबली आहेत. महापुरुषाचे पुतळे, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, फर्निचर, विद्युतीकरण आदी कामे थांबली आहेत. पाठपुरावा नसल्याने मागणी करूनही निधी मिळालेला नाही. तर दुसरीकडे बीड जिल्हा परिषदेतील रिक्त पदांमुळे कामे होत नाहीत. अशी ओरड करण्यात येत असली तरी अधिकाऱ्याचा अकार्यक्षमपणा आणि अर्थपूर्ण व्यवहारामुळे किरकोळ कामेही होत नाहीत. बांधकाम विभागातील सर्वच कामाचा आढावा घ्यावा. पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी निधी उपलब्ध करुन घ्यावा आणि विकास कामांना गती द्यायला हवी, अशी मागणी करण्यात आली आहे.
बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या क्रमांक १ कार्यालयाचे पान २ वर




## किरकोळ कामे आणि दुरुस्तीही नाही

**अतिवृष्टीमुळे बीड जिल्हा परिषदेच्या तळमजल्यात पाणी घुसले होते. सदर पाणी काढण्यासाठी पाच- सहा दिवस लागले. करोडो रुपयांच्या इमारीसाठी तळ मजल्यावरील पाणी खेचण्यासाठी पंप बसविण्यात आलेला नाही. यातून अधिकाऱ्याची निष्क्रियता आणि कर्तव्यशून्यता दिसून येते. खाऊगिरी वाढल्यामुळे किरकोळ कामातही काही मिळते का ? हे पहिले जाते.**

## बांधकाम विभागातील कारभार ढेपाळला

कार्यकारी अभियंता बांधकाम नं.१ प्रमाणेच कार्यकारीअभियंता बांधकाम विभाग नं.२ विभागातील कारभार ढेपाळला आहे. आर्थिक गैरव्यवहार आणि अकार्यक्षमता यामुळे रजेवर गेले कार्यकारी अभियंता हे रुजू झालेआहेत. मात्र वेगळ्याच तंद्रीतअसलेल्या कार्यकारी अभियंत्याला जिल्ह्यात कोणती कामे चालली ? आणि कुठे कोण काय, काम करतो ? याचा काही थांगपत्ता नसतो. या विभागातही अनियमितता वाढली आहे.

# पोलीस अधीक्षकांनी महामार्गावरील लुटीचा तपास एलसीबीकडे दिला



बीड दि.६ (प्रतिनिधी):- धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर गेवराईसह इतर ठिकाणी लुटमारीच्या घटना घडल्या आहेत. सदरील प्रकारामुळे बीड जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागले आहेत. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी स्वत: या प्रकरणात लक्ष घातले असून महामार्गावरील लुटीचा तपास पान २ वर

## खा.बजरंग सोनवणेंचे एस.पी.ंना पत्र

**बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना पत्र पाठविले आहे. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या गुन्हेगारी घटना बाबत तातडीने कारवाई करण्याच्या सूचना खा.सोनवणे यांनी पोलीस अधीक्षकांना केल्या आहेत. प्रवाशांची सुरक्षितता ही प्राथमिक जबाबदारी असून या संदर्भात ठोस आणि परिणामकारक** पान २ वर

# यशवंत महाराज तालखेडकर यांचे निधन

## आज अंत्यविधी

बीड दि.६ (प्रतिनिधी):- येथील जिल्हा परिषदेतील निवृत्त आरोग्य कर्मचारी ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. यशवंत महाराज तालखेडकर यांचे दि.६ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. यशवंत महाराज यांच्या पार्थिवावर आज दि.७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



सेवानिवृत्ती नंतर धार्मिक कार्यात वाहून घेतलेल्या ह.भ.प. यशवंत महाराज यांनी ज्ञानेश्वरीची दीर्घ साधना केली. संपूर्ण मराठवाड्यात शेकडो पारायणे त्यांच्या अधिपत्याखाली झाली. ते अत्यंत मनमिळावू आणि धार्मिक प्रवृत्तीचे होते. धर्म कार्यामध्ये त्यांचा नेहमी पुढाकार होता. भजन, कीर्तन आणि सत्संगाला त्यांनी पान २ वर

# राज्यात तापमानाचा पारा घसरला



मुंबई दि.६ (प्रतिनिधी):- राज्यात तापमानाचा पारा घसरला असून थंडीची लाट आली आहे. काही ठिकाणी गारठा कमी झाला आहे. पहाटे गारठा कायम असला तरी, आकाश निरभ्र होऊन कमाल तापमानात चढ-उतार होत आहे. पुढील दोन दिवसांत राज्याच्या किमान तापमानात हळूहळू घट होत पुन्हा गारठा वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. नागपूर, संभाजीनगर, नंदुरबार, जळगाव पान २ वर






## अनिलदादा जगताप यांचा जिल्हाधिकारी यांना सवाल

# महाडीबीटी अनुदान अडकलं कुठे ?

बीड दि.६ (प्रतिनिधी):- बीड मतदारसंघातील महाडीबीटी अंतर्गत लॉटरी पद्धतीने पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांना अनुदान तात्काळ वितरीत करण्यात यावे, अशी ठोस मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. लॉटरी प्रक्रियेत निवड झाल्यानंतर अनेक लाभार्थी शेतकऱ्यांनी आवश्यक ती खरेदी पूर्ण केली आहे. मात्र सहा-सहा महिने उलटूनही अनुदानाची रक्कम खात्यात जमा होत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाच्या योजनेत पात्र ठरूनही निधी न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून तात्काळ निर्णयाची अपेक्षा आहे. पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांचे अनुदान तत्काळ मंजूर करून त्यांच्या खात्यात जमा करावे, जेणेकरून शेतकरी बांधवांवर अन्याय होणार नाही. असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# पाच एकरामध्ये दीड हजार संत्रा झाडे लावले

## पत्रकारांकडून फळबागेची पाहणी | फळबागेचा यशस्वी प्रयोग !





आष्टी दि.६ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील काकड्याची किन्ही येथे सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या ५ एकरातील १ हजार ५०० संत्रा झांडाची पाहणी झाली. यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे सदस्य उपस्थित होते.जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, उत्तम बोडखे, दत्ताभाऊ काकडे, प्रा.डॉ. विनोद ढोबळे, प्रविण पोकळे, भीमराव गुरव, रघुनाथ कर्डीले, संतोष सानप, शरद तळेकर, गणेश दळवी, शरद रेडेकर, सचिन रानडे, मनोज पोकळे हे उपस्थित होते.
किनी येथील ग्रामदैवत रेणुका देवी यात्रा निमित्त पुर्वसंध्येला स्नेहभोजन झाले. अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असलेल्या शेती व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगती होत असतानाच आष्टी तालुक्यातील विविध ठिकाणी शेतकऱ्यांनी फळबागाचा प्रयोग केला आहे.त्याला बऱ्यापैकी यश येत आहे.अशाच एका फळबागेला आष्टी तालुका पत्रकार संघाच्या सदस्यांनी आज शनिवारी भेट दिली. आष्टी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शेती क्षेत्रावर पश्चिम आणि दक्षिण आणि उत्तर दिशेला आहे.शेती क्षेत्र विस्तारलेले आहे.काही ठिकाणी सिंचन सुविधा आहेत तर बऱ्याच शेती क्षेत्राला पाण्याविना कोरडवाहू पिके घेणे वाचून पर्याय नाही.अशा स्थितीमध्ये आष्टी तालुक्यातील किन्ही गावांमधील शेतीनिष्ठ शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आणि कृषी क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार फळबागांचा प्रयोग केला आहे विविध जातीची आंबे,संत्री,मोसंबी, चिंच,डाळिंब यासह अनेक पान २ वर

CMYK

# पार्श्वभूमी

दिनांक ७ डिसेंबर २०२५ पान -३


## भगवान विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेबाना अभिवादन

बीड दि ६(प्रतिनिधी)- शहरातील भगवान विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यात आले.यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक गर्जे सर , पर्यवेक्षक ढोकर सर, डोळे सर, ठोसर सर, वडमारे सर, आराक सर तसेच क्रीडा शिक्षक भोसले सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी श्री वडमारे सर यांनी आंबेडकरांच्या जीवनकार्याचा गौरव मनोगतातून व्यक्त केला तर आराक सरांनी गीतातून आदरांजली अर्पण केली. अध्यक्षीय समारोपातून गर्जे सर यांनी केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती बाबर मॅडम यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्रीमती पवार मॅडम यांनी मानले.

## पाटोद्यात डॉ.बाबासाहेबांना अभिवादन

पाटोदा दि ६ (प्रतिनिधी)- महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन बुद्ध विहारात व आंबेडकर चौक पाटोदा या ठिकाणी उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ नरेंद्र जावळे (रिपाई नेते) या वेळी सोमनाथ कोल्हे राजू भैया भागवत येवले बळीराम पोटे रोहिदास गीते किशोर अडागळे सुनील वाघमारे गणेश नारायणकर पारगाव चे माजी सरपंच दत्ता साठे बाळासाहेब जावळे सांगवीचे ग्रामपंचायत सदस्य योगेश सानप अरविंद सरवदे चेतन जावळे आनंद जावळे निलेश जावळे गणेश शेलार डॉक्टर हरिदास शेलारअरुण जावळे ज्येष्ठ शिक्षक दे मा गुरुजी व इतर मान्यवर मानवंदनासाठी उपस्थित होते

# बीड शहरात असं घडू लागलंय म्हणे; जाळ्यात ओढलेल्या गुलहौशिला दारू पाजून काही ललना चक्क लुटू लागल्या?

बीड दि ६(प्रतिनिधी)- एकीकडे धुळे -सोलापूर महामार्गावर बीड जिल्ह्यासह धाराशिव जिल्ह्यामध्ये रॉबरीचे प्रकार घडत असताना बीड शहरात काही महिलांनी गुलहौसी लोकांना लुटण्याचा सर्रास प्रकार चालवला असल्याचे किस्से जनतेमधून ऐकायला मिळत आहेत. या महिला गूलहौशी लोकांना आपल्या जाळ्यात ओढून शहरातील अज्ञात स्थळी नेतात. या गूलहौशी सोबत मध्य प्राशन करण्याचे नाटक करतात. यात गुलहौसी मध्याच्या नशाखाली आलात की लागलीच त्याची अंग झडती घेऊन आहेत नाहीत तेवढे पैसे काढून घेतात. गुलहौसीच्या जवळ पाहिजे तसे पैसे मिळाले नाही तर त्याच्या अंगावरील दागिने देखील काढून घेण्यास कमी करीत नाहीत. बीड शहरात दररोज एक तरी असा प्रकार घडत असताना त्याची वाच्छता मात्र होत नाही. ज्याला लुटले तो झाकलेली मुठ सव्वा लाखाची म्हणून कुठे तक्रार करीत नाही. यामुळे या महिलांचे धाडस वाढले असून याला पोलिसांच्या विशेष करून महिलांच्या पोलीस पथकाने आळा घालावा व या महिलांच्या लुटमारीचा धंदा बंद करावा .अन्यथा एखादा गुलहौशीने त्याची परिसीमा गाठली तर खुनासारखे देखील प्रकार घडतील असे जनतेमधून बोलण्यात येऊ लागले आहे.

यासंदर्भात बीडमध्ये नुकतेच एक प्रकरण घडल्याची चर्चा होत आहे. देहविक्री करण्याच्या नावाखाली काही महिला मंडी सारख्या गर्दीच्या ठिकाणी दररोज थांबत असून मध्यप्राशन करून आलेल्या गुल हौशिने यातील एखाद्या महिलेकडे पाहिले तर लागलीच ही महिला त्याला दहा वीस मिनिट चर्चा करत आपल्या जाळ्यात ओढते. केलेल्या चर्चेमध्ये हा गुलहौसी किती पैसे सांभाळून आहे यावर त्या निर्णय घेतात. पैसेवाला आणि अंगावर दागिने असलेला गूलहौसी समोर आला तर लागलीच त्याला जागा देणाऱ्या महिलेच्या घरी नेले जाते. तिथं या महिला त्याच्याबरोबर दारू पिण्याचे नाटक करतात. कधीकधी स्वतःही पितात .परंतु समोरचा दारूच्या आहारी गेल्याचे दिसून येतात आनखी पैशाची मागणी केली जाते त्यांनी मागितलेले पैसे या गुलहौसीनं दिले नाहीत तर त्याचे कपडे उतारून अंग झळती घेतली जाते. यावेळी संबंधिताकडे जेवढे पैसे निघतील तेवढ्यावर या महिला कब्जा करतात. पाहिजे तेवढे पैसे मिळाले नसतील तर त्याच्या अंगावरील दागिने देखील काढून घेतात. अशाच प्रकारचा एक किस्सा नुकताच समोर आला असल्याची चर्चा होत आहे. विशेष करून खरेदीसाठी आलेल्या ग्रामीण भागातील गुलहौसिंना टारगेट करून लूटण्याचा प्रकार होत असल्याचे देखील बोलले जात आहे. दोन-तीन दिवसा खाली अशाच एका गूल हौसिला दोन महिलांनी जागा देणाऱ्या महिलेच्या घरी नेले. तेथे त्याला बिअरच्या बाटल्या मागवायला लावल्या. स्वतः बियरचे एक दोन घोट घेतले. परंतु समोरच्याला मात्र येथेच जास्त बियर पाजल्या. सदर इसम नसे खाली जाताच त्याच्या मोबाईल मधील जवळपास दहा हजार, गळ्यातील सोन्याची चेन देखील काढून घेतली . या घटनेत त्याला जवळपास एक लाखाचा फटका बसल्या असल्याचे बोलले जाते. परंतु दारूच्या नशेत जेव्हा या इसमाने कुणालातरी बोलता-बोलता माहिती सांगितली त्यामुळे हे प्रकरण चर्चेत आले असे असले तरी बीड शहरांमध्ये असे प्रकार एक दोन दिवसाला होत असल्याचे देखील बोलले जात आहे. परंतु झाकलेली मूठ सव्वा लाखाची म्हणून गुल हौशी मात्र पोलीस ठाण्याचा रस्ता धरत नाहीत. यामुळे मात्र संबंधित महिलांचे लुटमारीचे कृत्य वाढत असल्याचे देखील या निमित्ताने समोर आले आहे.

### काही महिलांनी चक्क गुंड पाळले?

गुल हौसिला आपल्या जाळ्यात ओढून नेल्यानंतर संबंधित महिला जागा देणाऱ्या महिलेच्या घरी नेते. तिथे त्याच्याच पैशातून मानसन्मान करून घेण्यासाठी दारू मागवली जाते मध्याच्या आहारी गेल्यानंतर त्याने मन मानेल तसे पैसे दिले नाहीत तर त्याला लुटण्याचा प्रकार केला जातो. परंतु समोरचा गुलहौसी जर प्रतिकार करू लागला तर संबंधित महिला कोणाला तरी मोबाईल करून बोलावते. घरी आलेला गुंड प्रवृत्तीचा तरुण तू माझ्या घरात कशासाठी आला. बायाला छेडतो काय? असे म्हणून मारहाण देखील करतो. हा प्रकार घडत असताना प्रकरण मोठे होण्याची शक्यता लक्षात घेताच सदर गूलहौसी आपल्या जवळचे पैसे देऊन तेथून सुटका करून घेतो. सदर प्रकार ज्या भागात घडतो किंवा घरात घडतो त्याच्या शेजारील देखील याची वाच्छता कुठे करत नसल्याने या महिलांचे धाडस वाढले असल्याचे लोक बोलत आहेत. याला कुठेतरी आळा घालावा अशी पोलिसांना विनंती करीत आहेत.

### महिलांच्या पोलीस पथकाने या प्रकारावर लक्ष केंद्रित करावे

अगोदर तर बीड जिल्ह्यामध्ये दररोज कोणते नाव कोणते गुन्हे घडत आहेत. यातच असे झालेले प्रकार चव्हाट्यावर आले तर संबंधित महिलांचे धाडस वाढणार नाही. या लुटल्या गेलेल्या व्यक्ती बोलायला तयार नसल्याने प्रकरण चव्हाट्यावर येत नाही. तेव्हा गुपचुपरीत्या बिन बोभाट होत असलेल्या या प्रकाराला आळा घालण्यासाठी महिला पोलिसांच्या पथकाने या प्रकारावर लक्ष केंद्रित करावे. अन्यथा यामधून पुढे कदाचित गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही असे लोकांचे म्हणणे येत आहे.

## ज्येष्ठ नेते संदीपानतात्या हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष सोहळा संपन्न



केज दि ६ (प्रतिनिधी) -केज येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) जिल्हा कार्याध्यक्ष संदीपान तात्या हजारे यांच्या वाढदिवसा निमित्त केज येथील जनसंपर्क कार्यालयात ५ डिसेंबर रोजी सायंकाळी चार वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष सोहळा संपन्न झाला.

यावेळी सुरुवातीस संदीपान तात्या हजारे यांचा पुष्पहार अर्पण करून सत्कार करण्यात आला. उपस्थित नेत्यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा स्वागताने व्यक्त केल्या आणि त्यांच्या आरोग्य व दीर्घायुष्या साठी प्रार्थना केली. कार्यक्रमात बाबुराव गालफाडे सर, तपसे, अंगद शिनगारे, शरद थोरात, मोहन मस्के, दयानंद गुंडरे, भीमा हजारे आदी नेत्यांनी उपस्थिती दर्शवली. तालुकाध्यक्ष सुनील हिरवे यांनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागची पार्श्वभूमी विशद करताना सांगितले की संदीपान हजारे हे नेहमीच दलित आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांसाठी आवाज उठवणारे नेता राहिले आहेत आणि स्थानिक प्रश्नांसाठी त्यांनी केजमध्ये अनेक प्रयत्न केले आहेत. या प्रसंगी विविध गावांचे कार्यकर्ते आणि युवा कार्यकर्तेही सहभागी झाले होते. अशा प्रकारच्या स्थानिक सन्मान सोहळ्यां मुळे राजकीय कार्यालये आणि कार्यकर्त्यांमध्ये सामंजस्य वाढण्यास मदत होते, असे स्थानिक चर्चेत नोंदले गेले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) चे तालुका व जिल्हा पातळीवरील पुढील उपक्रम व जन आश्वासन यावरही कार्यक्रमात चर्चा करण्यात आली.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवास भाजप कार्यालयामध्ये विनम्र अभिवादन



बीड दि.६(प्रतिनिधी)- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील भाजपा जिल्हा कार्यालय बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला भाजपा पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी राज्य परिषद सदस्य ॲड. सर्जेराव तांदळे, श्री. गणेश लांडे पाटील, अशोक लोढा, श्री. शांतिनाथ डोरले, प्रा. देविदास नागरगोजे, मा. इर्शाद भाई, सुंदर चव्हाण, सुनील मिसाळ, संतोष मिसाळ, धनंजय वाघमारे, अमर सानप, घोलप मामा, केशव बडे, यांच्यासह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राध्यापक नागरगोजे व ॲड सर्जेराव तांदळे यांनी महामानवाच्या देशासाठी दिलेल्या योगदानाचा उहापोह केला.

## आज केज येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा

केज दि ६ (प्रतिनिधी) -येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय येथे मराठा सेवा संघाच्या वतीने रविवार दिनांक ७ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्काराचे वितरण संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष गट शिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे हे असणार आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग करणारे, विद्यार्थ्यांमध्ये मूल्य शिक्षण रुजवणारे, समाजाभिमुख कार्य करणारे तसेच शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदर्श शिक्षकांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार महादेवी फुलसुरे, मोहन ढाकणे, व्यंकट चव्हाण, संध्याराणी कोल्हे, सुरेखा मोराळे, नवनाथ घुगे, रेखा धेंडे, संगीता नवले, नितीन हावळे, स्वाती वरपे, बाबुराव तांबडे, बालासाहेब लोखंडे, आश्रुबा गायकवाड, पुंडलिक पोपळघाट, शामल जाधव या शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.तर कार्यक्रमास डॉ. अशोक थोरात संचालक, आरोग्य विमा महामंडळ, महाराष्ट्र राज्य, राकेश गिड्डे तहसीलदार, केज, शैलेश फडसे मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड नगर परिषद, जी.बी. गदळे सचिव, जीवन विकास शिक्षण मंडळ, केज, नागनाथ जाधव जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ बीड, शिवश्री डॉ. भाऊसाहेब चाळक जिल्हा उपाध्यक्ष म.से.सं. बीड, दत्तात्रय चाटे शिक्षण विस्तार अधिकारी, हनुमंत भोसले सामाजिक कार्यकर्ते, केज, हनुमंत घाडगे ज्येष्ठ साहित्यिक, केज, डॉ. हनुमंत सौदागर, जनार्धन सोनवणे ज्येष्ठ साहित्यिक, केज, शिवाजी ठोंबरे जिल्हाध्यक्ष छावा संघटना, बीड, भाई मोहन गुंड नेते शेकाप केज विनोद शिंदे जिल्हाध्यक्ष, म.से.सं, समन्वयक, बीड गोविंद नाना शिनगारे, केज, राहुल खोडसे जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, बीड यांसह विविध मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अमरनानांनी पुढाकार घेऊन केलेल्या नाली व सिमेंट रस्त्याला आली झळाळी



बीड दि ६(प्रतिनिधी)- शहरातील हनुमान नगर भागातील हाती घेतलेले सिमेंट कॉंक्रेट रस्ता व नाली बांधकाम आत्ता दोन दिवसांपूर्वी हा रस्ता पूर्ण झाले. प्रभागातील प्रत्येक भागात मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी नागरिकांचा लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करणारे अमर नाना नाईकवाडे यांनी पुढाकार घेऊन या केलेल्या रस्त्याच्या कामाला झळाळी आली आहे म्हणूनच याच बळावर ते निवडणुकीत मताचे दान मागत आहेत. स्वाभिमानी व जागृत मतदार हेच त्यांचेभांडवल असून तेच आता पैशाच्या बळावर निवडणूक जिंकू पाहणाऱ्या प्रवृत्तींचा पराभव केल्याशिवाय शांत बसणार नाहीत. असे लोक बोलू लागले आहेत..ही निवडणूक झाल्यानंतर सुद्धा आणखी किमान दोन महिने विकास कामे सुरू राहतील. इतकी कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. विकासात्मक दूरदृष्टी घेऊन अमर नाना नाईकवाडे यांचा राजकीय व सामाजिक प्रवास सुरू आहे. जागृत मतदारांच्या बळावरच ही निवडणूक मी एकतर्फी जिंकणार असल्याचे लोकांचे म्हणणे येत आहे. बीड शहरातील २६ प्रभागात आपला प्रभाग ३ मूलभूत सुखसुविधांच्या बाबतीत परिपूर्ण आहे आणि तो आपण परिपूर्ण करू शकलो याचा मला मनस्वी आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले. मतदारांनी गेल्यावेळी जो विश्वास माझ्यावर टाकला तो सार्थकी लावण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न या कामांच्या माध्यमातून करत होतो, करत आहे आणि करत राहील असे आश्वासन देखील या निमित्ताने बोलताना दिले.

## लिंबादेवी यात्रेत बाळाला शिखरावरून टाकण्याची पारंपरिक प्रथा आजही कायम



पाटोदा दि ६ (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी गावातील ग्रामदैवत लिंबादेवी यात्रा यंदाही मोठ्या उत्साहात साजरीकरण्यात आली . दत्तजयंती निमित्त दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या या यात्रेत देवीला नवस केलेल्या लहान बाळाला शिखरावरून टाकण्याची प्राचीन प्रथा विधिवत पार पडली . नवस फेडण्यासाठी शेकडो कुटुंबांनी देवीसमोर हजेरी लावली होती.

अनेक जण हे देवीला आपले बाळ शिखरावरून खाली सोडण्याचे नमस्कार देवी नवसाला पावल्यानंतर बाळांना प्रतीकात्मकरीत्या खाली सोडण्याची परंपरा अनेक वर्षांपासून पाळली जाते. भाविकांच्या मते, 'देवी नवसाला पावणारी आहे' अशी लोकश्रद्धा असून, त्यानुसार ही प्रथा आजही कायम आहे.पिठ्ठी, नायगाव, उखंडा, निरगुडी, तसेच पंचक्रोशीतील गावांमधील नागरिक मोठ्या संख्येने यात्रेस उपस्थित राहिले. सर्वधर्मसमभाव, सामूहिक सहभाग आणि आनंदाचा माहोल यामुळे यात्रेचे सार्थक स्वरूप अधिकच खुलले.लिंबादेवी मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक विधी, वारी, महाप्रसाद आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरण निर्माण केले होते. ग्रामीण भागातील सर्वांत प्राचीन व लोकप्रिय यात्रांपैकी एक असलेल्या या लिंबादेवी यात्रेला यंदाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## योगासन स्पर्धेत कु.कार्तिकी थोरात व कु.प्रियंका थोरात राज्यस्तरावर तृतीय

केज दि ६ (प्रतिनिधी) राज्यस्तरीय योगासन स्पर्धा दिनांक २ डिसेंबर रोजी

छत्रपती संभाजी नगर येथे दोन डिसेंबर रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेमध्ये तालुक्यातील ढाकेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनीं कु. कार्तिकी ज्ञानेश्वर थोरात व कु. प्रियंका गोविंद थोरात यांनी आर्टिस्टिक पीअर योगा या प्रकारामध्ये राज्यस्तरावर तृतीय क्रमांक मिळवून घवघवीत यश मिळवले.

सदरील विद्यार्थिनींचा तालुका जिल्हा व विभाग स्तरावर प्रथम क्रमांक आलेला होता. त्यामुळेच त्या राज्यस्तरावर खेळण्यासाठी पात्र ठरल्या .राज्य स्तरावर आठ विभागातून आलेल्या विविध स्पर्धकांनी सर्वोत्कृष्ट अशी योगासने सादर केली. सादर केलेल्या योगासना मध्ये ढाकेफळ शाळेच्या विद्यार्थिनींनी सर्व तृतीय क्रमांक मिळवला. छत्रपती संभाजी नगर विभागातून योगासनामध्ये बक्षीस मिळवणारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ढाकेफळ ही एकमेव शाळा आहे. त्यांच्या या यशाबद्दल कार्तिकी ज्ञानेश्वर थोरात व प्रियंका गोविंद थोरात तसेच त्यांना उत्तम प्रशिक्षण देऊन योग्य मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका श्रीमती मेघना नेहरकर मॅडम शाळेचे मुख्याध्यापक धनराज अंधारे सर व सर्व स्टाफ यांचे सर्व स्तराकडून कौतुक होत आहे. शाळेने मिळवलेल्या यायशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष ज्ञानेश्वर थोरात उपाध्यक्ष श्रीमती आशाबी उस्मान सय्यद केज केंद्राचे केंद्रप्रमुख संजय चवरे सर, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी . दत्तात्रय चाटे तसेच केज तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांनी त्यांचे कौतुक केले

## मनोज जरांगे यांचा दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने यथोचित सन्मान



बीड दि ६ (प्रतिनिधी)- अंतरवली सराटी येथील संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे यांना संविधान अमृत महोत्सवी अवचित्याने महाराष्ट्र राज्य दिव्यांग अधिकारी कर्मचारी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक कचरू आठवले यांच्या नेतृत्वात भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेने दिव्यांग कर्मचारी संघटना बीड जिल्हा अध्यक्ष अजिनाथ हाडुळे, सचिव दिनेश गाडे यांच्या शिष्ट मंडळांने सन्मानित करण्यात आले यावेळी जरांगे यांचे विश्वासू सहकारी गंगाधर काळकुटे, सामाजिक कार्यकर्ते अशोक ढोले, समाधान घरत इ. दिव्यांग कर्मचारी संघटना पदाधिकारी व समाजबांधवांचा प्रामुख्याने समावेश होता.

याप्रसंगी अशोक आठवले यांनी मनोज दादा जरांगे यांच्याशी उपेक्षित सामाजिक बांधवांच्या स्वावलंबन करण्याविषयीच्या लढ्याबाबत विस्तृत चर्चा करून,हयापुढे आपला लढा भारतीय संविधानाच्या अनुपालनाशिवाय पूर्णत्वास जाऊ शकत नाही या स्वरूपाची जाणीव मनोज दादा जरांगे यांना आठवले यांनी करून दिली. तसेच यापुढे मी माझ्या समाज बांधवांकरीता भारतीय संविधानातील तरतुदींचे अनुपालन करुनच समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता यशस्वीरित्या प्रयत्न करण्यास कटिबद्ध राहील व दिव्यांग व्यक्तींप्रतिही सहानुभूतीपुर्वक प्रयत्न करुन शासन दरबारी त्यांच्या मागण्यांची प्रतिपुर्ती करण्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करण्यास कटिबद्ध राहील असे मनोज दादा जरांगे यांनी दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना आश्वस्त केले. त्याचबरोबर शासनाच्या अखत्यारीतील दिव्यांग कर्मचारी / दिव्यांग व्यक्तींना उद्भवणाऱ्या समस्यांची जाणीवही संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी मनोज दादा जरांगे यांना निवेदनाद्वारे करून दिली .

## साईराम मल्टीस्टेटचा फरारी संचालक भगवान काळे यास आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केले जेरबंद

बीड दि ६(प्रतिनिधी)- साईराम मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह निधी लिमिटेड बीड या संस्थेचा फरार असलेले शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील संचालक भगवान भानुदास काळे वय ४६ राहणार यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले गेवराई येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक करण्यात आली असल्याचे सूत्रांनी सांगितले

यासंदर्भात माहिती अशी की, साईराम मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह निधी लिमिटेड च्या विरोधात गुन्हे दाखल झालेले आहेत . यात आरोपीमध्ये संचालक भगवान भानुदास काळे याचा समावेश असून गुन्हा दाखल झाल्यापासून ते फरार होते असे असताना ते आर्वी येथे आल्याची माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक संतोष शेजाळ यांनी पोलीस हवालदार रामदास तांदळे व भाऊसाहेब चव्हाण यांना सदर ठिकाणी पाठवून त्यांनी सदर आरोपीस दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी आर्वी गावातून पकडून पोलीस ठाणे गेवराई गुन्ह्यात अटक करण्यात आली. सुदर संचालक हा साईनाथ परभने यांचा सखा मेव्हणा आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. संतोष शेजाळ, पोलीस हवालदार रामदास तांदळे, पोलिस अमलदार भाऊसाहेब चव्हाण आर्थिक गुन्हे शाखा बीड बीड यांनी केले आहे.

## गीता कन्या विद्यालयात निबंध स्पर्धा उत्साहात

बीड दि ६ (प्रतिनिधी)- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील गीता कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

गीता कन्या विद्यालयाचे प्राचार्य एस. ए. पेशकार यांच्या अध्यक्षतेखाली निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेवेळी दोन गट तयार करण्यात आले होते. पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी असे दोन गट तयार करून निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत संस्थेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत आठवी ते दहावी या गटात प्रथम - रिद्धी संतोष यादव, द्वितीय - आदिती संतोष गोळे, तृतीय- श्रद्धा संतोष धुतावळे तर उत्तेजनार्थ बक्षीस रिया ओव्हाळ हिला देण्यात आले. पाचवी ते सातवी गटामध्ये प्रथम- पूर्वी गौतम वाघमारे, द्वितीय- भूमिका रणजीत चौगुले, तृतीय- प्रांजली दशरथ खंडागळे या बक्षीस पात्र झाले आहे. या स्पर्धेमध्ये विद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य एस. ए. पेशकार, शिक्षक, कर्मचारी व प्रतिष्ठित नागरिक यांनी अभिनंदन केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय

## फास्टफुड आरोग्यास घातक

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

# माजलगावात रिक्षा वाहतुकीला शिस्त लावण्याची गरज

### *वाहतुकीला अडथळा: इंडीकेटर न लावता वळवली जाते रिक्षा तर कधी मारला जातो अचानक ब्रेक*

### नवीन बसस्थानका समोर रिक्षा व ट्रॅव्हल्स मुळे होते वाहतुकीची कोंडी, रिक्षात मोठ्या आवाजामध्ये वाजवली जातात गाणे

माजलगाव (प्रतिनिधी) शहरात शेकडो प्रवाशी रिक्षा रस्त्यावर धावतात. रिक्षाचालकाला कोणताही नियम नाही. चौक आसो की मुख्य रस्त्यावर प्रवाश्याने हात करताच वाहतुकीला अडथळा निर्माण करत रिक्षा आहे. शहरातील रिक्षावाहातुकीला पोलीस प्रशासणाने शिस्त लावण्याची गरज आहे.

माजलगाव शहरात मंदीरासह शासकीय निमशासकीय कार्यालय, तसेच विवीध शैक्षणीक संस्था, खाजगी व शिक्षणासाठी येणारे विद्यार्थीची संख्याही मोठी आहे. त्यामुळे प्रवाशांच्या वहातुकीसाठी त्या प्रमाणात शेकडो रिक्षे रस्त्यावर धावत आहेत. रिक्षाचालकाचे नवीन बसस्थानक, जुने बस स्थानक बाबासाहेब आंबेडकर चौक हनुमान चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक राजे मल्हारराव होळकर, छत्रपती संभाजी चौक येथे रिक्षा वहातुकीचे थांबे आहेत. प्रवाशांच्या संख्या जास्त आसल्यामुळे त्यांनाही मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत आहे. मात्र रिक्षा वहातूकीला शिस्त नसल्यामुळे वहातुकीला

मोठया प्रमाणात अडथळा ठरत आहे. रस्त्यावर सुसाट वेगाने धावणाऱ्या रिक्षाला रस्त्यावरच्या प्रवाश्यांने हात दाखवताच पाठीमागे वाहन आहे की नाही खात्री न करता आहे त्या गतीत वर्दळीच्या

ठीकाणी, मुख्य रस्ता, चौकात अचानक कांही रिक्षाचालक ब्रेक मारत रिक्षा थांबवत आहेत. तर कधी आहे त्या गतीत इंडीकेटर न लावता रिक्षा रस्त्यावरच गरकन वळवली जात आहे. त्यावेळी

पाठीमागे वेगात आसलेल्या वहानधारकांची मात्र चांगलीच बांभरी उडत आहे तर कधी आपघात होत आहे. रिक्षा रस्त्यावर, चौकात थांबला की वहातूकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. अश्यावेळी ईतर ही रिक्षाचालक एकत्र येत वहानधारका बरोबर तु-तु मै-मै व हंबरी तुंबरी तर कधी कडाक्याचे भांडण होत आहे.

**रिक्षाची चौकातच पार्कींग**

ग्रामीण भागातील टमटम रिक्षाचालकाचे वेगळे थांबे आहेत. थांब्यावरचे प्रवाशी घेऊन वर्दळ आसलेल्या नवीन बस स्थानक अण्णाभाऊ साठे चौक छत्रपती शिवाजी महाराज चौकात तासन तास थांबून ईतर वहाणधारकाला अडथळा निर्माण करत आहेत. चौकात ट्रॉफीक पोलीस आसतात तेही रिक्षा चालकास भ्र शब्द बोलत नाहीत. त्यामुळे रिक्षाचालक बिनधास्तपणे चौकात खाजगी वाहन तळाप्रमाणे रिक्षा लावत आहेत.

# केज तालुक्यात दोन अपघातात,दोघांचा मृत्यू मयतामध्ये झारखंड मधील मजुराचा समावेश

केज, दि. ६ (प्रतिनिधी)- तालुक्यात झालेल्या २ ठिकाणच्या अपघातात २ जण ठार झाले . यामध्ये एका घटनेत झारखंड राज्यातील हजारीबाग जिल्ह्यातील एका मजुराचा समावेश आहे.

केज तालुक्यातील कानडीमाळी शिवारातील योगिता स्टोन बुधवारी सकाळी साडे सहा वाजण्याच्या दरम्यान योगिता स्टोन आणि खडी क्रेशर मशीन परिसरात एम एच २० / ई जी ४०१२ या हायवाचा चालक बाजीराव बापूराव फुंदे रा जीवाचीवाडी याने आपल्या ताब्यातील हायवा हयगयीने व निष्काळजीपने चालवून खादानीच्या भिंतीला लागून उभा असलेल्या झारखंड राज्यातील मजूर साहिल प्रवाज सखावत वय २६ वर्षे रा रागडीह ता चालकुसा, जि हजारीबाग, याला खदानीच्या भिंतीत दाबल्याने, यात गंभीर जखमी होऊन हा मजूर जागीच ठार झाला. केज येथील उपजिल्हा रुग्णालयात पार्थिवाची उत्तरीय तपासणी करून पार्थिव नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. शुक्रवारी सायंकाळी साडे चार वाजता मयत मजुराच्या पार्थिवावर त्याच्या मुळगावी रागडोह, झारखंड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.या प्रकरणी मयताचे वडील हुसेन इस्माईलमीयां सखावत यांच्या फिर्यादीवरून हायवाचा चालक बाजीराव बापूराव फुंदे रा जीवावाचीवाडी याच्या विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आसून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उप निरीक्षक प्रल्हाद चव्हाण हे तपास करीत आहेत.

दुचाकी व टिप्परचा दुसरा अपघात गुरूवारी रात्री साडे आठ वाजता तांबवा शिवारातील विठ्ठलवाडी परिसरात घडला आसून यात दुचाकीस्वार जागीच ठार झाला आहे

विलास दुबाजी खुराडे वय ३२ वर्षे हे आपल्या ब्राह्मवाडी ता परतूर जि जालना येथून आपल्या दुचाकी क्रमांक एम एच २१ - बी डबल्यू ३५७१ वरून कळंब येथील आपल्या साडूच्या भेटीला जात आसताना केज तालुक्यातील तांबवा शिवारातील विठ्ठलवाडी परिसरात त्यांच्या दुचाकीला टिप्पर क्रमांक एम एच ४४ - यु २७१४ च्या चलकाने आपल्या ताब्यातील टिप्पर निष्काळजीपने व हयगयीने चालवून या दुचाकीला पाठीमागून धडक



दिली. या अपघातात दुचाकीवरील विलास दुबाजी खुराडे हे जागीच ठार झाले. त्यांच्याही पार्थिवाची उत्तरीय तपासणी करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. सहाय्यक उपनिरीक्षक प्रल्हाद चव्हाण यांनी घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला.

## कै.बि.दे.राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा



बीड दि. ६ डिसेंबर - राजस्थानी सेवा समाज संचलित कै. बि. दे. राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालय सहयोगनगर, बीड या विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक महेश पारीख सर, सर्व कर्मचारी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महेश पारीख सर व सौ. धारूरकर मॅडम हे होते. तर प्रमुख पाहुणे तसेच प्रमुख वक्ते म्हणून डावकर सर हे होते. यावेळी प्रमुख वक्ते डावकर सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच डावकर सर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी समाजात जगण्यासाठी जीवनात बाबासाहेबांचे विचार धारण केले पाहिजे असे प्रतिपादन केले. तसेच अध्यक्षीय समारोपात धारूरकर मॅडम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. शिवम निषाद चि. सुयोग डावकर यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन कुलकर्णी मॅडम यांनी केले. यावेळी २५ विद्यार्थ्यांची भाषणे झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभाग प्रमुख सिकची सर, एकशिंगे सर, पंडित सर, राडीकर मॅडम, सारडा मॅडम, जोशी मॅडम, उमेश कोठी, रमेश शिंदे, गीता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## चौसाळा येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध ठिकाणी महामानवास अभिवादन

चौसाळा दि ६ (प्रतिनिधी)- महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपुर्ण देशभरात साजरा करण्यात येतो या निमित्ताने बीड तालुक्यातील चौसाळा येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विविध ठिकाणी अभिवादन करुन महापरिनिर्वाण दिन साजरा केला.

या निमित्ताने चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच अंकुश कळासे यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले .यावेळी ग्रामपंचायत सदस्य किशोर ढोकणे,विलास वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, ग्रामपंचायत सदस्य कोंडिराम जोगदंड, पत्रकार विकास सर्वज्ञ, दादाराव ढोकणे, लखन जोगदंड,इसाक सय्यद, ग्रामपंचायत लिपिक पवार साहेब उपस्थित होते यानंतर चौसाळा शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील नामफलकाला उपसरपंच अंकुश कळासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले तसेच चौसाळा शहरातील भीम नगर येथिल बुध्दविहारात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण आकृती पुतळ्यास चौसाळा ग्रामपंचायतचे सदस्य किशोर ढोकणे व चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी बापु चव्हाण,प्रभू मस्के,बबन पवार,तानाजी इंगळे,विनोद घोडके,रोहीत जावळे,साहील चव्हाण,विपुल चव्हाण,विकी सिरसाळे, लखन

### चौसाळा शहराचे सरपंच यांना महापरिनिर्वाण दिनाचा विसर



जोगदंड,दादाराव ढोकणे, पंकज रूपवते, सागर पवार,जितरत्न विवेक कुचेकर यांच्या सह महीला भगिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या यावेळी बुध्द वंदना घेऊन अभिवादन सभेचा समारोप करण्यात आला.

दरम्यान चौसाळा ग्रामपंचायत कोणत्यान कोणत्या कारणाने नेहमीच चर्चेत असुन येथिल सरपंच हे महापरिनिर्वाण दिनी गैरहजर राहल्यामुळे येथील आंबेडकरी जनेतेतुन नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. प्रत्येक महापुरुषांच्या जयंती दिनाला सरपंच हे गैरहजर राहत असल्याने बहुजन समाजातुन संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून शालेय साहित्य वाटप

बीड दि ६ (प्रतिनिधी) - बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास बीडवासीयांनी पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपने,बीड यानी बीडवासियांना गरजू होतकरू विद्यार्थ्यांकरिता शालेय साहित्य (वही पेन किंवा आर्थिक सहाय्य) करण्याचे आवाहन केले होते. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. महापरिनिर्वाणदिन ते क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले स्मृतिदिनापर्यंत १५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करता येईल एवढे साहित्य व आर्थिक दान मिळाले. फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांची ज्योत आपल्या लेखणीतून तेवत ठेवणाऱ्या वृत्तरत्न सम्राट चे १०० अंक महामानव सार्वजनिक वाचनालय व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने वाटप करण्यात आले. महामानव अभिवादन ग्रुप बीड यानी सर्व दानदात्यांचे आभार व्यक्त केले..

## बोधिसत्व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करून शालेय साहित्य वही,पेन दान केले

बीड दि.६ (प्रतिनिधी):- बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास बीडवासीयांनी पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपने,बीड यानी बीडवासियांना गरजू होतकरू विद्यार्थ्यांकरिता शालेय साहित्य (वही पेन किंवा आर्थिक सहाय्य) करण्याचे आवाहन केले होते. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला व महापरिनिर्वाणदिन ते क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले स्मृतिदिनापर्यंत १५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करता येईल एवढे साहित्य व आर्थिक दान मिळाले. फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांची ज्योत आपल्या लेखणीतून तेवत ठेवणाऱ्या वृत्तरत्न सम्राट चे १०० अंक महामानव सार्वजनिक वाचनालय व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने वाटप करण्यात आले. महामानव अभिवादन ग्रुप बीड यानी सर्व दानदात्यांचे आभार व्यक्त केले व पुढे देखील अभिवादन ग्रुप संचलित ४ मोफत शिकवणी वर्ग तसेच महामानव सार्वजनिक वाचनालयाला भरघोस सहाय्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी अभिवादन ग्रुपचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# कै.अण्णासाहेब पाटील महामंडळाचा परतावा थांबला



बीड दि ६ (प्रतिनिधी)- कै.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांमधून कर्ज घेतलेल्या मराठा समाजातील लाभार्थ्यांचा व्याज परतावा मागील दोन महिन्यांपासून थांबला असून, त्याचबरोबर नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी प्राथमिक मंजुरी पत्र मिळत नसल्याने मराठवाड्यातील तरुणांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या समस्येवर तातडीने तोडगा न काढल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अखिल भारतीय मराठा महासंघाने दिला आहे.

योजनेच्या लाभापासून तरुण वंचित

अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले आणि बीड जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सरकारचे लक्ष वेधले आहे. त्यांनी म्हटले आहे की, व्याज परतावा थांबला: महामंडळाच्या योजनेअंतर्गत कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांचे व्याजाचे हप्ते भरूनही परतावा मिळत नाहीये, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक नियोजनावर मोठा परिणाम झाला आहे. नवीन व्यवसायांना खीळ: नवीन उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे 'एलओआय' (डजख) देणे महामंडळाकडून बंद करण्यात आले आहे. यामुळे बेरोजगार तरुण स्वयंरोजगाराच्या संधीपासून वंचित राहत आहेत. बेरोजगारीचा प्रश्न गंभीर: मराठवाड्यात आधीच बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे आणि सुशिक्षित तरुणांना मोलमजुरी

## मराठा महासंघाचा आंदोलनाचा इशारा

करण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत, महामंडळाच्या योजना मराठा तरुणांसाठी एक 'नवीन आशा' ठरल्या होत्या, मात्र आता त्या बंद झाल्याने मोठे संकट उभे राहिले आहे. कै. अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या योजनांचा लाभ न मिळण्यामागे महामंडळाची वेबसाइट आणि पोर्टल बंद असणे हे मुख्य कारण असल्याचे समोर आले आहे. मागील काही महिन्यांपासून महामंडळाचे 'महास्वयम पोर्टल योग्य प्रकारे काम करत नसल्याच्या तक्रारी आहेत. वेबसाइट तांत्रिक अडचणींमुळे किंवा अपडेटच्या नावाखाली वारंवार बंद असल्याने ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्णपणे थांबली आहे.परिणामी, नवीन कर्जासाठी अर्ज करणे, कागदपत्रांची पूर्तता करणे आणि महत्त्वाचे म्हणजे व्याज परताव्याचे दावे दाखल करणे अशक्य झाले आहे. काही माध्यमांच्या माहितीनुसार, महामंडळाच्या योजनांमध्ये गैरमराठा लाभार्थ्यांनी कर्ज मिळवल्याच्या आणि एजंटमार्फत फसवणूक होत असल्याच्या तक्रारीनंतर पोर्टल अपडेट करण्याचे काम सुरू असल्याचा खुलासा महामंडळाकडून करण्यात आला होता. दरम्यान विनोद आप्पा इंगोले आणि बापूसाहेब साळुंके यांनी शासनाला तातडीने महामंडळाचे कामकाज सुरळीत करण्याची मागणी केली आहे. त्यांनी दोन महिन्यांपासून बंद असलेला परतावा लवकरात लवकर चालू करण्याची आणि नवीन व्यवसायांसाठी एलओआय (डजख) देणे पूर्ववत करण्याची मागणी केली आहे.

जर शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केले आणि मराठा समाजातील तरुणांना न्याय दिला नाही, तर अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पत्रकाद्वारे देण्यात आला आहे.

# पाटोद्यात विविध कामात मोठा भ्रष्टाचार प्रकरणी न्यायालयीन लढ्यासोबत जनतेच्या आंदोलनाची गरज- ॲड.जाधव

पाटोदा दि ६ (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील विविध कामात मोठ्या प्रमाणात कोट्यावधी रुपयांचा गैरप्रकार झालेली असून अनेक अनेक गैरप्रकार संदर्भात न्यायालयात लढा चालू आहे. न्यायालयीन लढ्या सोबतच जनतेच्या आंदोलनाची गरज असल्याचे प्रतिपादन उच्च न्यायालयाचे विधिज्ञ तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार प्रदेश उपाध्यक्ष अँड नरसिंह जाधव यांनी केले.

शंभर चीरा ते पाटोदा या जवळपास साडेसहा कोटी रुपयाचे सडकेचे काम अंदाजपत्रक प्रमाणे न करता निकृष्ट दर्जाचे झाले असून या कामाची चौकशी होऊन काम उत्कृष्ट दर्जाचे करावे नित्कृष्ट दर्जाच्या झालेल्या कामाच्या निषेधार्थ एक दिवशीय तहसील समोर उपोषण करण्यात आले.या आंदोलनात बहुतांशी पक्षा च्या पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शवत आंदोलनात सहभाग नोंदवला राष्ट्रीय काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव उबाठा शिवसेनेचे तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे वंचित बहुजन चे सचिन मेघडबर मनसेचे कैलास दरेकर भारतीय किसान सभेचे कॉ महादेव नागरगोजे शेतकरी कामगार पक्षाचे भाई विष्णुपंत घोलप सहभागी झाले होते.

एडवोकेट नरसिंह जाधव यांनी पुढे बोलताना सांगितले की पाटोदा तालुक्यातील विविध कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेले आहेत मांजरा नदीवर पूल मध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे उघड झाले आहे त्यासोबत पाटोदा नगरपंचायत द्वारा २०१५ ते २०२० पर्यंत च्या कार्यकाळात झालेल्या कामात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार केला गेला. शिवाजीनगर पाणीपुरवठा योजना पैठण पंढरपूर रस्ता साळ नदीवरील पूल यापैकी अनेक कामासंदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. न्यायालयीन लढा आपण देत आहोत मात्र या लढ्यासाठी जनतेच्या आंदोलनाची करत आहे असे सांगून शंभर चीरा

पाटोदा या रस्त्याचे जवळपास साडेसहा कोटी रुपयांचा रस्त्याचे काम अंदाजपत्रक प्रमाणे केले नाही अनेकांनी अनेक वेळा या संदर्भात तक्रारी केल्या मात्र अधिकारी व गुत्तेदार यांनी संगमने तक्रारी कडे कानडोळा करून तक्रारीकडे दुर्लक्ष केले आपण तक्रार केल्यानंतर काम पुन्हा डबल दिलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे करू असे आश्वासन दिले मात्र आश्वासन देऊनही अद्याप काम चालू करण्यात आले नाही यासोबत त्यांनी क्रांतीनगर मधील रस्ते उकडून खराब केले गायरान जमिनी व तसेच शुद्ध पाणीपुरवठा योजना आदी कामाचा उल्लेख करत या कामातही मोठा गैरप्रकार झाल्याचे सांगितले आपण अनेक गैरप्रकार कामात केलेल्या भ्रष्टाचारा संदर्भात उच्च न्यायालयात लढा देत आहोत. यासाठी जनतेनेही जागरूक होऊन या भ्रष्टाचाराचे विरोधात लढा देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले .यावेळी कॉ महादेव नागरगोजे कैलास दरेकर , शिवभूषण जाधव यांची ही भाषणे झाली.मागण्याची निवेदनावर कॉम्रेड महादेव नागरगोजे मुकुंदशिंदे सर्जेराव जावळे दादाराव जावळे निसार शेख राजेंद्र जोगदंड भाऊसाहेब पावशे नदीम ॲडव्होकेटनाईकनवरे विठ्ठल सचिन हिरामण पावशे भागवत खाडे भाऊसाहेब बांगर संग्राम गीते दळवी चंद्रकांत रवींद्र बाबुराव गायकवाड महादेव जाधव चंद्रकांत जाधव आदीच्या सह्या आहेत निवेदन तहसीलदार निलावडे यांना देण्यात आले.

### भ्रष्टाचार झालेला लोकप्रतिनिधींना माहित नाही काय?

माजी आमदार भीमराव धोंडे माजी आमदार बाळासाहेब आजबे काका व तसेच दरेकर नाना हे पाटोदा तालुक्यातील लोकांशी फक्त निवडणुकी पुरतेच संपर्क साधतात. पाटोदा येथे प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असल्याचे त्यांना माहित नाही का ? या संदर्भात ते का बोलत नाही का लढा देत नाही ? माजी आमदारांचे गप्प बसण्याचे नेमके कारण काय ,,, ?असा प्रश्न उपस्थित करत त्यांची या भ्रष्ट कारभारास मूक संमती तर नाही ना , ?असा गंभीर आरोप भूषण जाधव यांनी बोलताना केला..

## जामखेड-पैठण बसचे चालक-वाहक यांचा कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर- खोपटी ग्रामस्थांकडून सत्कार

### जामखेड-पैठण बस कुसळंब- पिंपळवंडी-अंमळनेर-पाथर्डी मार्गे पूर्ववत सुरू

पिंपळवंडी दि.६ (प्रतिनिधी)- जामखेड आगारातून दुपारी २.३० वाजता सुटणारी कुसळंब- पिंपळवंडी-अंमळनेर-पांढरवाडी फाटा-पाथर्डी-शेवगाव मार्गे जा-ये करणारी जामखेड-पैठण बस रस्त्या अभावी काही महिन्यापासून बंद करण्यात आली होती.कुसळंब घाटातील रस्ता वाहतुकीस सुरळीत झाल्याने तीन डिसेंबर बुधवारपासून जामखेड आगाराने जामखेड-पैठण बस पूर्वीप्रमाणे पूर्ववत सुरु केली आहे.यानिमित्त कुसळंब-पिंपळवंडी-खोपटी ग्रामस्थ व प्रवाशांच्या वतीने चालक निलेश यादव,वाहक काकासाहेब उगलमोगले यांचा कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर येथे फेटा,शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.राज्य परिवहन महामंडळ प्रादेशिक व्यवस्थापक नाशिकचे विजय गीते साहेब यांच्या सहकार्याने व



ग्रामस्थ,पत्रकारांच्या प्रयत्नाने बस पूर्ववत सुरू केल्याल्याबद्दल परिसरातील प्रवाशांनी समाधान व्यक्त करून बस सेवेचे स्वागत केले.तसेच जामखेड- शिरूर (कासार) मुक्कामी बस पण पूर्ववत सुरू करण्यात आलेली आहे.सत्कार प्रसंगी पिंपळवंडीचे सरपंच निलेश मोरे,कुसळंबचे सरपंच किरण पवार,उपसरपंच उमाकांत चौधरी, मा.सरपंच महादेव पवार व मा.सरपंच राजेंद्र वारे,जालिंदर वाघमारे खोपटी, चेअरमन भागवत खरमाटे,शिवनाथ आण्णा पवार ग्रा.पं.सदस्य बद्री पवार, जालिंदर पवार तसेच पत्रकार बबन उकांडे,भाऊसाहेब पवार सह शहादेव पवार,नानाभाऊ पवार,प्रभाकर पवार गुरुजी,साहेबराव भनगे,रोहित (बाळा) पवार,श्रीकृष्ण कुलकर्णी,सिताराम वारे,सूर्यभान वारे,गोरख वारे,सागर दहिफळे,बाबूराव धारक,भाऊराव पवार,चंद्रकांत पवार,बाजीराव पवार, जनार्धन दगडे ,अंकूश पवार,गणेश पवार,अक्षय पवार,किमकर तसेच चंदू धनवटे,एकनाथ पवार,गणेश वारे, तुकाराम सोनवणे (चालक) आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# आजी समजून घेताना

आजही अगदी लख्ख आठवतं आजीचं खास करून सर्व नातवंडातुन मला वळण लावणं माझ्यावरच लक्ष. हे लक्ष का तर मी लहानपणी अगदी चंचल आणि खोडकर होते. एक दिवस मी लहान असताना अगदी पाच वर्षाचीच असेल, खेळायला जात असे.माझी शाळा सुटली की माझं ठरलेलं असायचं, जेवण होतं ना होतं तोच मी खेळायला पळायची . हे आजीला कळताच ती मला खेळायला पाठवायची नाही आणि आजी आपल्याला खेळायला जाऊ देणार नाही, हे लक्षात येताच मी तिची नजर चुकवून पळ काढत असे. ती मला सांभाळायची कारण माझी आई शिक्षिका असल्याने शाळेत जात असायची मग मी घरी आल्यानंतरही बऱ्याच वेळानं आई घरी यायची तोवर मला आजीच सांभाळायची. जेवू घालायची. माझ्याकडे विशेष असं लक्ष द्यायची. मला जरा म्हणून नजरेआड करत नसे, कारण मी कधी –काय खोडी करेल किंवा कधी घरातून बाहेर खेळायला जाईल काही नेम नसायचा. मग हे माझं असं खेळायला जाणं तेही उन्हाच्या वेळी, आणि लहान आहे कुठे –कुठे जाईल म्हणून नेम नाही. या कारणामुळे मग ती मी शाळेतून घरी आले की गेट ला कुलूप लावायची .आणि चावी कुठे ठेवी काही मेळ नसायचा तरीही एक दिवस मी कुलूप आणि चावी घेऊन तिची नजर चुकवून गेट उघडलंच त्या दिवशी मी बाहेर पाऊल ठेवते ना ठेवते तिने माझा हातच धरला. मग आता मला कळलं की आता खेळायला जाणं अवघडच ,मग काय घरीच बसावं लागलं पण मी घरी तिच्यासोबत जेव्हा बसले तेव्हा तिने मला बाहेर खेळायला जाण्याहून सुरस आणि रंजक किस्से सांगितले तिने तिच्या बालपणीचे किस्से मला सांगायला सुरुवात केली . ती मला म्हणाली ''शांभू ,मी लहानपणी आमच्या मैत्रिणींबरोबर उन्हाळ्याच्या सुट्टीत बरेच खेळ खेळायचे, मी खूप हुशार होते'' असे माझे ''बप्पा'' (म्हणजे आजीचे वडील) तिला म्हणायचे. तिच्या लहानपणीचे किस्से फारच गमतीदार असत .आणि तिच्या सांगण्याची पद्धत देखील तिचं ''म्हणींचं'' ज्ञान खूप जास्त होतं . तिने मला मराठी भाषेतल्या किंवा दैनंदिन भाषेत वापरात असलेल्या अनेक म्हणी सांगितल्या होत्या. जसे की , ''खाईल तर तुपाशी नाही तर उपाशी'', '' वासरात लंगडी गाय शहाणी''. ती फक्त मला म्हणी सांगत नसायची तर या म्हणींचा मतीत अर्थ देखील सांगत असायची . इयत्ता चौथी शिकलेल्या माझ्या आजीला संपूर्ण ज्ञान अवगत होतं. फक्त ते ''पुस्तकी भाषेत ''नव्हतं एवढंच बरं का ! तिच्या या म्हणी आणि वाक्प्रचारामुळे मला आपली मराठी भाषा कधीच परकी वाटली नाही. मला मराठी भाषा शिकताना या म्हणींमुळे, वाक्प्रचारामुळे मराठी बद्दलची माझी गोडी वाढतच गेली . मला सुईत धागाही ओवता येत नव्हता मी खूप प्रयत्न करत होते, जमतच नव्हतं . मला मदत कोण करेल असा विचार मनात येताच उत्तर मिळाले की ''आजी'' मी धावत तिच्यापाशी गेले. तिला म्हणाले बघ ना मला सुईत धागाही ओवता येत नाहीये. तेव्हा ती म्हणाली ''ये इकडे आज मी तुला शिवायच कसं ते शिकवते'', आणि तिने मला ते सर्व दाखवलं. ती अगदी व्यवस्थित आणि नीट– नेटक शिवत होती . सुई दोरा ओवताना आपण तो कसा धरायचा आणि कसा ओवायचा हे सगळं मला समजलं. आणि मी तिला शिवून दाखवू लागले ती मला सूचना करत गेली आणि तो कपडा शिवत गेले आणि मग कपडा शिवल्यानंतर आम्ही दोघेही खुश होतो. तिने मला शिकवलं म्हणून मी खुश व तिला मला शिकवता आलं म्हणून ती खुश असं होतं आमच्या या छोट्याशा आनंदाचे समीकरण.

ज्यावेळी माझी बारावी झाली तेव्हा आता मी उच्च शिक्षणाकरिता बाहेर जाणार असं ठरत होतं त्या काळात अनेक कारणांमुळे ते वारंवार रद्द होण्याच्या मार्गावर होतं पण ,या सगळ्यात जेव्हा माझा धीर खचायचा मी खट्टू होऊन बसायचे तेव्हा –तेव्हा माझ्या आजीने मला हे समजावून सांगितले की परिस्थिती कशीही असो आपण कधीही धीर सोडायचा नसतो. अगदी दोन–तीन वेळा तरी तिने मला रडत असताना खूप समजावलं. माझ्याजवळ येऊन म्हणाली ''शंभू, बेटा ,अशी रडू नकोस, रडत बसलीस तर मग कसं होईल रडणं हा पर्याय नसतो ग प्रत्येक परिस्थितीला धीराना तोंड देत असतात''. खरच हे तिचे शब्द ऐकून मी रडायचीच थांबले. आणि आजही जेव्हा मी गंभीर परिस्थितीत अस्थिर होत असते तेव्हा मी तिचे ते शब्द आठवत असते. खरंच त्यामुळे मी आज स्थिर राहायला शिकत आहे आणि राहीन ही. एके दिवशी मी सहज आजी पाशी बोलायला तिच्याशी गप्पा मारायला गेले , तशी ती मला खूप काही नवनवीन गोष्टी ,नवनवीन किस्से कलाकुसर, नीटनेटकेपणा या साऱ्याबद्दल खूप अनमोल असं ज्ञान देत असे . तिच्याबरोबर बसले की कधीही कंटाळा येत नसे .ती बोलायचीच तशी अगदी रंजकतेने.

बोलताना मधे –मधे ती अनेक नवनवीन शब्द वापरायची आणि मग मी '' त्या शब्दांचे अर्थ काय आहे ग आजी''? असं तिला विचारायचे ती धोपाटनं, पाटांगण , वसरी ,माळवद, गमच्या, पेला, वाडगं असे अनेक शब्द बोलताना वापरायची , आणि फार गंमत वाटायची आम्हा दोघींनाही .जणू काही आम्ही एकमेकींच्या घट्ट मैत्रिणीचं होतो की काय असा भासायचं. अनेकदा तर ती कुठेही गावात फिरत असताना, देवळात जाताना मलाच आवर्जून बरोबर घेऊन जात असायची .आणि चालता – चालता आम्ही खूप गप्पा मारायचो अगदी दिलखुलास. माझी आजी वयाने मोठी होती आणि विचारानं थोर .कारण ती एक परंपरे बरोबरच आधुनिकतेचं स्वागत करणारी होती .तिला आजच्या काळात ,आजच्या पिढीला काय आवडतं ,काय नाही आवडत हे सगळं ती जाणून होती आणि ती तसे शब्दही वापरायची जे नवीन पिढींशी जुळतील जसं की ''थँक्यू '',''सॉरी'', ''बेस्ट ऑफ लक'', ''ओके'', असे काही . आणि हे ऐकून आम्हा सर्व नातवंड तिला आश्चर्याने म्हणायचो ''आजी ,कुठून शिकलीस गं ? '' ''भारीच गं !'' ती लगेच म्हणत असे ''माझ्या नाती नातवंड इतके शिकलेत मला पण यायला हवं ना इंग्लिश''. खरंच किती भारी होती आजी आज दुर्दैवानं ती आपल्यात नाही. पण तिने संस्काराची, मूल्यांची, सद्गुणांची , अशा अनेक शिदोऱ्या शब्दरूपी आम्हा सर्वात वाटल्या आहेत. तिचं तिच्या आम्हा सर्वां नातवंडावर अपार प्रेम होतं .सर्व नातवंडांबद्दल सगळी माहिती ठेवणारी ,हाताला उत्तम चव असणारी ,अशी माझी आजी कायम आमच्या मनात राहील ! किती –किती म्हणून सांगावं अशी ती होतीच . ती फक्त रूपाने सुंदर नव्हती तर ती कर्तुत्वानं देखील विशाल होती.



शांभवी जगदीश
८४४६०४२४५८

■■■

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त सावरकर महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिर



बीड (प्रतिनिधी) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने सावरकर महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.स्वा. सावरकर महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर होते तर व्यासपीठावर कार्यालयीन अधीक्षक डॉ. प्रशांत तालखेडकर यांची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाचे ऊपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी भारताची लोकशाही सर्वश्रेष्ठ असून प्रगल्भ व भक्कम असल्याचे वर्णन केले. याचे मूळ आधारस्तंभ हे भारताचे संविधान असून, संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत उपयुक्त अशी देशाला सर्वोच्च ठेऊन सर्व जनसमुदायास उपयुक्त असलेली राज्यघटना तयार केल्याचे सांगितले. राज्यघटनेचा उल्लेख करीत जगभरात ताठमानाने भारतीय लोकशाही कशाप्रकारे समृद्ध आणि प्रगल्भ होत आहे व येत्या काळात भारत महाशक्ती होईल असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी डॉ. बाबासाहेबांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व व ज्ञानाचा अथांग महासागर असल्याचे सांगितले तसेच त्यांनी केलेल्या जलनीती, अर्थशास्त्र, कायदा, कामगार, रोजगार, महिला,व बालकल्याण यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. राम गव्हाणे यांनी केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राजपाल जाधव , प्रा. राम गव्हाणे व सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी हजर होते. दुसऱ्या सत्रात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व एचडीएफसी बँक लिमिटेड शाखा बीड यांच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अनेक विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले. रक्तदान संकलित करण्यासाठी शासकीय रुग्णालय बीड येथील रक्तदान विभागाचे कर्मचारी हजर होते.

## गणेशनगर शाळेत डॉ. आंबेडकरांना अभिवादन

बीड (प्रतिनिधी) बीड तालुक्यातील लिंबागणेश केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशनगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेश भट उपस्थित होते. प्रथमतः महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शाळेचे सहशिक्षक संतोष हावळे यांनी मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री.महेश भट यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. खाऊच्या वाटपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## शिर्डीतील राज्य शालेय क्रिकेट निवड स्पर्धेत बीडच्या शौर्य शैलेश जाधवची महाराष्ट्र संघात निवड



बीड दि ६ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने शिर्डी येथे आयोजित राज्य शालेय क्रिकेट (ण-१७) मुलें निवड स्पर्धा सन २०२४-२५ साठी राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांतील शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या स्पर्धेमध्ये राज्यभरातील हजारो प्रतिभावान खेळाडूंच्या दमदार कामगिरीतून ७० ते ८० उत्कृष्ट खेळाडू यांची पुढील निवड चाचणीसाठी निवड करण्यात आली. कठोर निवड प्रक्रियेनंतर महाराष्ट्र राज्य शालेय क्रिकेट संघासाठी केवळ १६ मुलांची अंतिम निवड करण्यात आली.यात १६ राज्यस्तरीय निवडीतील मुलांत बीड जिल्ह्याचा शौर्य शैलेश जाधव याने आपली विजयी मजल मारत राज्य संघात स्थान पटकावले आहे.

शौर्यच्या या कामगिरीमुळे बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून त्याचे प्रशिक्षक, पालक, शाळा, तसेच जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी यांच्याकडून शौर्यवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. बीड जिल्ह्याच्या क्रिकेट आसोसेशनच्या वतीने तसेच बीड जिल्हा क्रिकेट वकील संघ आणि फ्रेंड्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने शौर्य शैलेश जाधवचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील स्पर्धांसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



रायमोहा–येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करताना सरपंच सुभाषराव क्षीरसागर, ग्रामपंचायत सदस्य सुनील सानप, पत्रकार गोकुळ सानप, शुभम टाक बाबुराव तांबारे, विनायक कुलकर्णी, बाबूलाल बागातदार, राहुल मेहेत्रे आदी.

# श्री स्वामी अमृत भारती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे रंगोत्सव स्पर्धेत मोठे यश

पिंपळवंडी दि.६(प्रतिनिधी)– पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी रंगोत्सव कॉम्पिटिशन परीक्षा घेण्यात आली होती.या स्पर्धेचा निकाल २६ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर झाला असून या स्पर्धेत भाग घेतलेल्या इयत्ता सातवी ते बारावीच्या ३३ विद्यार्थी–विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन करून गोल्ड मेडल,ब्राऊन मेडल,अवार्ड ट्रॉफी पटकावून विद्यालयाचा नावलौकिक केला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे संस्थापक महंत ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज यांनी कौतुक केले आहे.रंगोत्सव कॉम्पिटिशन स्पर्धा परीक्षेत ग्रेड रँक कार्टून मेकिंग स्पर्धा,स्केचिंग कॉम्पिटिशन, एनस्ट्रोनोट गॅलेक्सी प्रोजेक्टर ग्रिटिंग कार्ड आदी स्पर्धेचा समावेश होता.यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संविधान दिनी दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयाचे प्राचार्य ए.एम.पवार सर,प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफीचे वितरण करण्यात आले.यावेळी बांडराव सर यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय रंगोत्सव व आर्ट कॉम्पिटिशन संघटना व अध्यक्ष ही स्पर्धा घेण्यामागचे कारणे व उद्दिष्ट सांगितले.तसेच प्राचार्य पवार सर म्हणाले की,कला शिक्षक बांडराव सर हे राष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धा व इलेमेंटरी, इंटरमिजिएट स्पर्धांचे



सुयोग्य नियोजन करून विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परीक्षेची तयारी व मेहनत घेतात व संपूर्ण तयारीला विज्ञानाचे ज्ञान विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना संधी देतात व त्यांच्या या यशात बांडराव सरांचे मोठे योगदान असते.या कार्यक्रमात प्रताप पवार सर,गाडे मॅडम, सावंत मॅडम यांचेही भाषणे झाली.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष महंत महादेवानंद भारती महाराज,सचिव प्रताप पवार सर,प्राचार्य पवार सर, शिक्षक बांडराव सर,नजान,डांभे, भोसले, मुळे, लाड, जरे,पोकळे मॅडम, गाडे मॅडम,सावंत मॅडम,चौधरी मॅडम, शिंदे सर,वाल्हेकर सर,डोके सर,अर्जुन भणगे,शेख आदीब तसेच बजगुडे मामा,बिबीशन पवार,महादेव पवार, छगन गाडे आदीसह ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## सिंदफणा पब्लिक स्कूलमध्ये 'संविधान जागर' उपक्रमाचे प्रेरणादायी आयोजन



माजलगाव (प्रतिनिधी) : भारतीय संविधानाची मूल्ये तळागाळापर्यंत पोहोचावीत, तसेच नव्या पिढीच्या मनामध्ये संविधानाबद्दल आदर, आस्था, सन्मान आणि आपुलकी निर्माण व्हावी या उद्देशाने सिधफणा पब्लिक स्कूल येथे 'संविधान जागर' हा अनोखा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाचे मार्गदर्शन भिडेवाडाकार विजय वडवेराव यांनी केले असून त्यांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल उत्सुकता व जाणीव निर्माण होत आहे. शालेय वयातच संविधानाचे महत्त्व समजल्याने विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार नागरिकत्वाची बीजे रोवली जात आहेत.माजलगाव येथे संविधान दूत म्हणून दुर्गा राऊत या सक्रियपणे कार्य करत असून, त्यांच्या कार्याला सर्व स्तरातून उस्फूर्त प्रतिसाद व प्रोत्साहन मिळत आहे. शाळा, समाज आणि पालकवर्ग यांच्यातून त्यांचे कौतुक होत आहे.या उपक्रमामुळे 'माणूस माणसाला आणि माणूस संविधानाला ओळखू लागला आहे' अशी सकारात्मक भावना नागरिकांत निर्माण होत आहे. समाजप्रबोधनाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

# आहारच नव्हे तणावही मधुमेहाचे कारण – डॉ.जगदीश टेकाळे



बीड (प्रतिनिधी) : मधुमेह हा आज सर्वात वेगाने वाढणारा आजार मानला जातो. केवळ मोठ्या शहरांतच नव्हे तर ग्रामीण भागातही मधुमेहाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. साइलेंट किलर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या आजाराने लाखो लोक त्रस्त आहेत. चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव आणि असंतुलित जीवनशैलीसोबतच मानसिक ताणतणाव हाही एक गंभीर घटक आहे.

तणावाचा शरीरावर परिणाम : मानसिक तणाव हा आजच्या वेगवान जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनला आहे. कौटुंबिक अडचणी, नोकरीतील दबाव, आर्थिक ताण किंवा वैयक्तिक समस्या, या सर्व गोष्टींमुळे मनावर ताण येतो. तणावाच्या काळात शरीरात कोर्टिसोल नावाचे संप्रेरक मोठ्या प्रमाणात स्त्रवते. हे संप्रेरक इन्सुलिनच्या कार्यक्षमतेत अडथळा आणते. त्यामुळे रक्तातील ग्लुकोजची पातळी वाढते.

तणावामुळे वाढणारा धोकाः अनेक संशोधनांतून हे स्पष्ट झाले आहे की मानसिक ताण हा केवळ मनावरच नाही तर शरीरावरही परिणाम करतो. ताणतणाव दीर्घकाळ टिकला तर तो मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार अशा गंभीर आजारांना आमंत्रण देतो. विशेषतः ज्या लोकांच्या कुटुंबात मधुमेहाचा इतिहास आहे, त्यांना तणावामुळे हा आजार लवकर होण्याची शक्यता जास्त असते.काय करावे ? : मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि तणाव टाळण्यासाठी जीवनशैलीत काही बदल करणे अत्यंत गरजेचे आहे.संतुलित आहार : फायबरयुक्त अन्न, भाज्या, फळे, डाळी, संपूर्ण धान्य यांचा समावेश करावा. गोड, तळलेले आणि फॅटयुक्त पदार्थ शक्यतो टाळावेत. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो. ९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

# उसाचा दर जाहीर, शेतकरी एकजूटीचा विजय –राजेंद्र आमटे

## साखर कारखाने पहिला हप्ता २७७५ रु ; गुळ उद्योगाने तत्काळ पाहिला हप्ता जाहीर करावा !

बीड दि.४ (प्रतिनिधी )- माजलगाव मधून सुरू झालेलं ऊस भाववाढ आंदोलन हे बीड जिल्हा व संपूर्ण मराठवाड्यात पेटले. माजलगाव तालुक्यातील संपूर्ण युवा शेतकरी संघर्ष समितीच्या तरुण युवकांनी संघर्ष करत २४०० रु. पहिला हप्ता देऊ म्हणणारे कारखानदार हे पहिला हप्ता २७७५ रु.देण्यास तयार झाले असून हा शेतकरी एकजुटीचा विजयी असल्याचे मत शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील पिंपळनेर परिसरात बेडकुचीवाडी, सांडरवन, लिंबारूई, कुर्ला, आहेर चिंचोली, रंजेगाव , मुग्गाव, पाटेगाव, पिंपळादेवी, सुर्डि, तांदळवाडी, नांदुर, खामगाव, येतील शेतकरी हा या आंदोलनात सहभागी झाला अनेक ठिकाणी बीड मधील पिंपळनेर परिसरात, आहेर चिंचोली परिसरातील शेतकरी हा माजलगाव मधील आंदोलनात सहभागी झाला. वाढते आंदोलनच लोन पाहता कारखानदार व शेतकरी पुत्र यांच्यामध्ये बैठका झाल्या व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी कारखाना २८०० पहिला हप्ता, सुंदरराव सोळुंके कारखाना तेलगाव, जय महेश कारखाना २७७५ रु छत्रपती कारखाना २७५० रु देण्यास तयार झाले. त्यांचे आभार बीड तालुक्यातील गुळ उद्योग यांनी आपले दर जाहिर करण्यात यावेत याकडे शेतकऱ्याचे लक्ष केंद्रित झाले आहे. या वेळी बीड तालुक्यात पिंपळनेर परिसरात राजेंद्र आमटे, राजू वीर मुगगाव येथील तुकाराम दुबाले, भागवत (हानुमान) दुबाले, आण्णासाहेब दुबाले व जिजाभाऊ दुबाले तसेच बेडकुचीवाडी येथील शेतकरी रूपांगत जाधव, अशोक काशीद, माऊली जाधव, गणेश चिंचकर सांडरवन येथील शेतकरी पवनराजे दुबाले, राजेंद्र धुरवडे, लिंबरूई देवी येथील शेतकरी बालासाहेब पैठणे, सुभाषराव नांदे, अमोल दुबाले व बंडु मात्रे, पाटेगाव येथील शेतकरी गोविंद कदम, वचिष्ट वाघ, विजयराजे कदम व सोमनाथ कदम पिंपळादेवी येथील शेतकरी प्रदीपराव घुमरे, शुरेश दादा घुमरे, बालाप्रसाद आवारे, विशाल घुमरे, रंजेगाव येथील शेतकरी विलासराव आबुज, मुकुंद आबुज, युवराज आबुज, दिलीप आबुज आणि धनंजय आबुज , आहेर चिंचोली राकटे या सर्व शेतकरी बांधवांची मोलाची साथ मिळाल्याने आंदोलन यशस्वी झाले आहे.

# कठोर परिश्रमाशिवाय यश नाही–ॲड.संदीप बेदरे



बीड दि. ४ (प्रतिनिधी) - आपल्या आवडीच्या क्षेत्रात निश्चित ध्येय ठेवून योग्य मार्गदर्शनासह कठोर परिश्रम घेतल्यास यश निश्चित मिळते असे मत दै. मराठवाडा साथीचे उपसंपादक तथा ज्येष्ठ पत्रकार ॲड. संदीप बेदरे यांनी ज्ञानसागर गुरुकुल बीडमध्ये भारतीय सैनिक (अग्निवीर) मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतेनुसार करियर मधली वाट शोधावी व त्यासाठी एकच ध्येय निश्चित करून योग्य मार्गदर्शन घेऊन आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून परिश्रम घ्यावेत निश्चितच यश मिळेल त्यांनी स्वतःला आलेले अनुभव शेअर करत पत्रकार क्षेत्रातील करिअर विषयी देखील मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. बीड जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी पोलीस दलातील पोलीस भरती,डी.वाय. एस.पी., पोलीस अधीक्षक (आय.पी.एस.) पदासाठी स्पर्धा परीक्षेची विद्यार्थ्यांनी कशी तयार केली पाहिजे याची सविस्तर माहिती दिली , प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे यांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आर्मीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी आर्मी मध्ये जाण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी केली याचे सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानसागर गुरुकुल चे संचालक गणेश सानप यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य गीते व अजय तोंडे या विद्यार्थ्यांनी केले .आभार गुरुकुल च्या संचालिका स्वाती सानप यांनी मानले.

**जाहीरनामा**

**(वारसाचे प्रमाणपत्र बाबत जाहीरनामा )**

**मा.डि.एन.चामले सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) माजलगांव यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७६३/२०२५
(वकील–श्री. एम. डी. नरवटे)
कारभारी संतराम नरवटे व इतर १ विरुध्द निरंक

ज्यापेक्षा मयत संतराम नाना नरवटे हे दि. १६/१०/२०२४ रोजी पायतळवाडी / धनगरवाडी ता. माजलगांव जि. बीड येथे मयत झाला आणि त्यांचे वारस **अर्जदार : १. कारभारी संतराम नरवटे,** वय–४५ वर्षे धंदा– शेती रा. पायतळवाडी / धनगरवाडी ता. माजलगांव जि. बीड **२. सुमनबाई भ्र. संतराम नरवटे,** वय–६५ वर्षे धंदा घरकाम रा. पायतळवाडी / धनगरवाडी ता. माजलगांव जि.बीड यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

त्याअर्थी मयत **संतराम नाना नरवटे** यांचे वारस अर्जदार हे नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने हया न्यायालयात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात वारस अर्जदार यांना सदरहू मयत संतराम नाना नरवटे चे कायदेशीर वारस असल्याबद्दलचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आवश्यकता:–** शासकीय व निमशासकीय कामासाठी.

आज तारीख ०५/१२/२०२५ रोजी आमचे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०९/०१/२०२६

आदेशावरून,
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव

# पार्श्वभूमी

दि.०७ डिसेंबर २०२५ रविवार




## संपादक अनिलराव वाघमारे यांना पितृशोक



वडवणी( प्रतिनिधी):- येथील साप्ताहिक डोंगरचा राजाचे संपादक अनिलराव वाघमारे यांचे वडील श्रीराम वाघमारे यांचे दिनांक ६ डीसेंबर शनिवार रोजी दुःखद निधन झाले ते९८ वर्षाचे होते. वडवणी येथील साप्ताहिक डोंगरच्या राजाचे संपादक अनिलराव वाघमारे यांचे वडील सेवानिवृत्त शिक्षक श्रीराम वाघमारे यांचे ६ डिसेंबर रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पाश्चात दोन मुले पाच मुली, सुना, नातू, पणतु असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने वाघमारे कुटुंबावर शोककळा पान २ वर

## पसायदान 'भित्तिपत्रकाचे' विमोचन

गेवराई, ता. ६ (प्रतिनिधी):- शहरातील जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सखारामजी कानगुडे यांनी तयार केलेल्या पसायदान 'भित्तिपत्रकाचे' विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जेष्ठ पत्रकार सुभाष मुळे, संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, संजय गायकवाड, गणेश कापसे, नामदेवराव पोटे, नारायण पवार, मुख्याध्यापक संभाजी करांडे, शांतीलाल कारंडे, डॉ. गणेश मोटे, अजिनाथ जाधव, परमेश्वर गिरे, रामेश्वर कापसे, सचिन गुरुजी वाघ व इतर पदाधिकारी व नागरीक उपस्थित होते.

# माजलगावात महामानवास अभिवादन करण्यासाठी उसळला भिमअनुयाई महासागर

**कॅण्डल हातात घेऊन रॅलीने अभिवादन ;उजाड राणी किमया केलीस मोठी, भिमा तुझ प्रणाम कोटी कोटी**





माजलगाव (प्रतिनिधी):- महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी माजलगाव शहर परिसरातील हाजारो भिम अनुयायी ने शहरातील नवीन बस स्थानक ते डॉ.आंबेडकर चौका पर्यंत हातात पेटती बेनबत्ती कॅन्डल घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर करांना अभिवादन करत व बुध्द वंदनेने पाऊले वदत चालत बा भिमा तुझ्या या लेकाराची वंदना,, आहे जय घोष करत महिला, वृद्ध ,करून भिम अनुयायींनी माजलगाव शहरात डॉ बाबासाहेबांना अत्यंत शिस्तबद्ध पणे अभिवादन केले.आहे. बंधुता निर्माण होण्यासाठी समाजात द्वेष, असूया, उच्चनिच, जातीभेद असता कामा नये आणि ही तिन्ही तत्वे एकत्र आल्याशिवाय राष्ट्र उभारणी शक्य नाही. - डॉ. बी..आर. आंबेडकर हा संदेश या वेळी देण्यात आला

## विष्णुपंत आतकरे यांच्यावर जातीवाचक शिवीगाळ व मारहाणीचा गुन्हा दाखल

गेवराई दि.६ (प्रतिनिधी):-शहरातील शाहूनगर मैदान परिसरात झालेल्या वादातून तरुणावर जातीवाचक अपमान व मारहाणीची घटना घडली असून या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरन क्रमांक ७१८/२०२५ असा दाखल झालेला हा गुन्हा भारतीय न्यायसंहिता कलम १२६(२), ११८(१), ३(५) तसेच अतिविषयक अत्याचार प्रतिबंधक कायदा ३(१)(r)(s), ३(२)(va) अन्वये नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी संकेत किशोर कोंडेकर (वय २४, रा. भीमनगर, गेवराई) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ११.४५ वा. ते शाहूनगर मैदानातून कृष्णाई बंगल्या दिशेने मोटरसायकलने जात असताना त्यांच्या मागून आरोपी विष्णुपंत आतकरे यांनी दुसऱ्या मोटरसायकलवरून येत वाहनाला अडवले. यावेळी आरोपीने जातीवाचक अपमानास्पद शिवीगाळ केली तसेच 'हे महाराचा पोरगं लै माजल आहे याची आई कशी निवडून येते ते बघतो,' अशा शब्दांत धमक्या देत मारहाण केल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. या घटनेनंतर संतप्त झालेल्या फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदवली असून या घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## गहाळ झालेले दोन मोबाईल वडवणी पोलीसांनी केले मालकांना परत

वडवणी (प्रतिनिधी):-पोलीस स्टेशन वडवणी येथे नागरीकाचे हरवलेले मोबाईल गहाळ झाले याबाबतच्या तक्रारी पोलीस स्टेशन वडवणी येथे प्राप्त होत असल्याने सदर तक्रारीचे अनुषंगाने गहाळ मोबाईलचा शोध घेणेकामी नवीनत कॉवत, पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्रीमती वर्षा व्हगाडे, पोउपनि श्री. श्याम गायकवाड, पोलीस अंमलदार विश्वजीत मुंडे, योगिराज कानतोडे व अमेर सय्यद यांनी (१) पांडूरंग सुखदेव कोळपे, रा. चिंचाळा, ता. वडवणी यांचा हरवलेला Vivo v२१०९ कंपनीचा मोबाईल व २)लक्ष्मण केरबा बागडे, रा. वडवणी, यांचा viv0 v२१०९ मोबाईलचा शोध घेऊन त्यांना परत दिला. त्यामुळे त्यांचे मोबाईल परत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत वडवणी पोलीसांचे आभार व्यक्त केले.



माजलगाव-शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक महेश खुणे सर यांचे भाचे डॉ याग्रिक धनंजय रणखांब यांची एमडी मेडिसिन या अभ्यासक्रमासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर या ठिकाणी नंबर लागल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना माजलगाव शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ, सुप्रसिद्ध निवेदक अशोक वाडेकर, प्रमोद काळे, दशरथ सोळंके, भागवत कोकणे,शिवाजी खुणे, स्वप्निल डोंगरे दिसत आहेत. समवेत वडील धनंजय रणखांब व आई सौ प्रेरणा रणखांब दिसत आहेत.

## उद्या डफी सिनेमासाठी ऑडिशन

बीड दि.६ (प्रतिनिधी)- साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ साहित्यिक, कथाकार डॉ.भास्कर बडे यांच्या डफी या कथेवर आधारित मराठी चित्रपट तयार होत आहे. या ऑडिशन बीड येथे सोमवारी दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे.

लातूर येथील चित्रपट निर्माते विशाल गिरी हे या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक असून, सोमवारी,श्र आदर्शनगर भागातील 'तुलसी संगणकशास्त्र महाविद्यालयाच्या, हॉलमध्ये दुपारी १.०० वाजता ऑडिशन घेतल्या जाणार आहेत .

डफीचे कथाकार डॉ.भास्कर बडे हे बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील लोणी गावचे रहिवासी आहेत. डफी या कथेतील वातावरण, भाषा, त्यातला निसर्ग हा लोणी गावच्या शिवारातील असल्यामुळे चित्रपटाचे शूटिंग, या परिसरात होणार असल्याची माहिती डफी चित्रपटाचे निर्माते,दिग्दर्शक विशाल गिरी यांनी दिली.

डफी या चित्रपटासाठी जास्तीत जास्त बीड जिल्ह्यातील कलाकारांना संधी दिली जाणार आहे, तरी कलाकारांनी ऑडिशनला यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पैठणच्या इतिहासात प्रथमच विश्वकल्याणार्थ २७ कुंडी महाविष्णूयाग यज्ञाचे आयोजन



गेवराई दि.६ (प्रतिनिधी) :- पैठणच्या इतिहासात प्रथमच विश्वकल्याणार्थ गुरुभक्ती ऐश्वर्य परंपरा महोत्सवाच्या २७ कुंडी महाविष्णूयाग यज्ञास मंगळवार दि.९ डिसेंबर पासून प्रारंभ होत आहे. या महोत्सवानिमित्त आयोजित २७कुंडी महायज्ञाची तयारी अंतिम टप्प्यात असून या कार्यक्रमाचे आयोजक नाथवंशज हभप योगीराज महाराज गोसावी यांनी कार्यक्रमस्थळी भेट देऊन पाहणी केली. या यज्ञ सोहळ्यास बहुसंख्येने सहभागी होऊन उपस्थित रहावे असे आवाहन नाथवंशज योगीराज महाराज गोसावी यांनी केले आहे. गुरु भक्ती व ऐश्वर्य परंपरा महोत्सव श्रीक्षेत्र पैठण येथे मंगळवार दि.९ डिसेंबर ते मंगळवार दि.१६ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपन्न होणार आहे. पैठणच्या इतिहासात प्रथमच विश्वकल्याणार्थ २७ कुंडी महाविष्णूयाग तथा भव्यदिव्य अखंड हरिनाम सप्ताह महायज्ञ महोत्सवाच्या दरम्यान द्वारका शंकराचार्य श्री सदानंद सरस्वती स्वामी महाराज यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून देशातील नामवंत साधू-संत देखील उपस्थित राहणार आहेत.

पान २ वर

## भोगलवाडी पं.स.मधून डॉ.तेजस तिडके यांना संधी देण्याचा युवकांचा निर्धार-अमोल मंत्री



बीड (प्रतिनिधी):-भोगलवाडी पंचायत समिती गण मधून भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तथा भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव अध्यापक महाविद्यालय कारी चे प्राचार्य डॉ. तेजस तिडके यांना भोगलवाडी पंचायत समिती गणनातून भारतीय जनता पार्टी कडून उमेदवारी देण्याच्या आव्हान माननीय पंकजाताई मुंडे यांना भोगलवाडी गणातील युवक वर्गांनी केले आहेत राजकारण हे एक समाजकारणाचे माध्यम म्हणून काम करणाऱ्या सर्वांच्या सुखदु:खाला धावून जाणाऱ्या तेजस सरांना आदरणीय ताई साहेबांनी भोगलवाडी पंचायत समिती गणतुन संधी द्यावी अशी मागणी अमोल मंत्री यांनी केले आहे. प्रा .तेजस तिडके हे भोगलवाडीतील एक उच्चशिक्षित चेहरा असून आतापर्यंत भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कामात हिरवीने भाग घेणारे कार्यकर्ते आहेत सर्वांना सामाजिक तसे शैक्षणिक दृष्ट्या मदत करणारे मुंडे घराण्याची कायम एक निष्ठ राहणारे व्यक्तिमत्व असून फ्रेश चेहरा म्हणून त्यांच्या नावास पसंती मिळत आहे पक्षश्रेष्ठीने त्यांच्या नावाचा विचार करून त्यांना भोगलवाडी पंचायत समिती गनातून उमेदवारी द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्ता अतिक्रमण मुक्त करा

**मुख्याधिकारी फडसे यांचे तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना**







बीड (प्रतिनिधी):-शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले असून या मुळे नेहमीच वाहतुकीची कोंडी असल्याने ही अतिक्रमणे तत्काळ काढण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पुसरेकर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या कडे केली आहे.

बीड शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले राजुरीवेस भागात असणारे मुख्य डाक घर (पोस्ट ऑफिस) हे नेहमीच विविध कामासाठी नागरिकांनी गजबजलेले असते. शहरातील हजारो नागरिक रोज या कार्यालयात कामानिमित्त येत जात असतात. मात्र या कार्यालयात पान २ वर

## भागुजीराव ढेकळे विद्यालयात जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा संपन्न

गेवराई दि. ६ (प्रतिनिधी) :- तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडळसिंगी येथे माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२ ते ६ डिसेंबर या कालावधीत प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा प्राचार्य थिटे ए. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. त्यांना पर्यवेक्षक रांजवण आर. डी., सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

## मराठी विज्ञान परिषदेच्या निबंध स्पर्धेत कु. समृद्धी मोताळे प्रथम



माजलगाव (प्रतिनिधी):-मराठी विज्ञान परिषद, मुंबई आयोजित राज्यस्तरीय विज्ञान निबंध स्पर्धा-२०२५ मोबाइलपासून मैदानाकडे या विषयावर घेण्यात आलेल्या स्पर्धत महात्मा फुले विद्यालय, माजलगावची विद्यार्थ्यांनी कु.समृद्धी सुनिल मोताळे हिने मराठवाडा विभागात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, ड. सिताराम शर्मा, सचिव माजी आमदार डी. के. देशमुख, मुख्याध्यापक किशोर मोताळे, पर्यवेक्षक सुधीर देशमुख, अर्चना भाले, उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांतराव बाहेगव्हाणकर, प्रा.संजय काळे, डॉ.प्रशांत तालखेडकर, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष तुकारामबापू येवले, पत्रकार पुरूषोत्तम करवा, मधुकरराव दिवाण, लक्ष्मीकांत भंडारी, सहशिक्षक श्याम जोशी, राजकुमार काळे यांनी तिचे अभिनंदन केले.

# सरकारकडून होत असलेला मुस्लिम द्वेष वक्फ बोर्डाच्या मुळावर-भागवत तावरे

तलवाडा दि.६ (प्रतिनिधी) :- देशभरातील ९६ लाख एक्कर जमिनीवर सरकारचा डोळा असून सरकारकडून मुस्लिम द्वेष वाढवला जात आहे. वक्फच्या जमिनी वाचतील यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत नाहीतर सरकार अदानी - अंबानी च्या घशात भूखंड घालायला सरकार मागेपुढे पाहणार नाही. दर्गाच्या जमिनी नोंदणीच्या नावाने किचकट प्रक्रिया करून ठेवली असून यातून मुस्लिम द्वेष दाखवत सरकारी यंत्रणा सामाजिक तेढ निर्माण करत असल्याचा आरोप भागवत तावरे यांनी केला. ते तलवाडा येथील हजरत टिपू सुलतान जयंती उत्सवात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी हिंदू-मुस्लिम मोठया संख्येने उपस्थित होते. हजरत टिपू सुलतान जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात व्याख्यान देताना भागवत तावरे यांनी चौफेर फटकेबाजी करत कधी युवकांना अंतर्मुख केले. हजरत टिपू सुलतान, इब्राहिम गार्दी यांचे दाखले देऊन मुस्लिमांनी देशाच्या उभारणीत वाटा उचलला आहे, मात्र तरीही मुस्लिम द्वेष केवळ सत्ताकारणाचे समीकरण ठरत असल्याने सरकार हा द्वेष सातत्याने वाढवत असल्याचा आरोप तावरे यांनी केला. युवकांनी शिक्षण आणि व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन करत निवडणूकीच्या काळात मतदान देण्याच्या व्यवहारिक प्रकारावर त्यांनी जोरदार प्रहार केला. निकोप लोकशाही आणि सृजनशील समाजासाठी आमच्यातील ऐक्य टिकवा असे आवाहनही भागवत तावरे यांनी केले. यावेळी हजरत टिपू सुलतान यांच्या जीवनावर पान २ वर

## भक्ती आणि प्रेम वाढविण्यासाठी भगवंताचे स्मरण करा-गणेश नावडे

**तळणेवाडी येथील हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता**



गेवराई दि.६ (बापू गाडेकर) :- संत हे जगाच्या कल्याणासाठी जन्म घेतात. त्यामुळे संतांच्या सानिध्यात राहून समाजाबरोबर जोडून रहा. आईची आणि गाईची सेवा केली तर या सेवेमुळे पुण्य प्राप्त होते. तसेच प्रत्येकाने भक्ती आणि प्रेम वाढविण्यासाठी भगवंताचे स्मरण करावे. भगवंताचे स्मरण केल्यास जीवन जगण्याची प्रेरणा व संकटावर मात करण्याची शक्ती मिळते असे मत हभप गणेश महाराज नावडे यांनी व्यक्त केले. गेवराई तालुक्यातील मौजे तळणेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहात काल्याचे किर्तनात ते बोलत होते.

गेवराई तालुक्यातील तळणेवाडी येथे गीता जयंती व श्री दत्त जयंती निमित्त वै.हभप स्वामी निगमानंद महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व वै.गंगाधर महाराज यांच्या आशिर्वादाने तसेच महंत जनार्दन स्वामी महाराज यांच्या प्रेरणेने सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची शनिवार दि.६ डिसेंबर रोजी भक्तीमय वातावरणात काल्याचे किर्तनाने उत्साहात सांगता झाली. जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या याल तर या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ।।१।। आजि देतों पोटभरी । पुरे म्हणाल तोंवरी ।।ध्रु.।। हळू हळू चला । कोणी कोणाशीं न बोला ।।२।। तुका म्हणे पान २ वर

# अंबाजोगाई पिपल्स बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' जाहीर

अंबाजोगाई (प्रतिनिधी):-जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' नुकताच घोषित करण्यात आला आहे. या संदर्भात ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशनच्या वतीने ही माहिती बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांना देण्यात आली आहे. रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण पुणे येथे आयोजित 'सहकार मंथन-२०२५' या सहकार परिषदेत मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

येथील अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेने दर्जेदार बँकींग सेवा देत ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. नुकतेच बँकेला एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले. यासाठी शहरी सहकारी बँक गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार - २०२५' ने ही गौरविण्यात आले आहे हे विशेष होय. तसेच आता जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' नुकताच घोषित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सहकार सभागृह, कॉसमॉस सहकारी बँक लि.मुख्य प्रशासकीय कार्यालय, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी आयोजित 'सहकार मंथन-२०२५' या सहकार पान २ वर

## ज्येष्ठ शाहीर तुकाराम ठोंबरे यांना सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते सांस्कृतिक पुरस्कार प्रदान





अंबाजोगाई दि ६ (प्रतिनिधी):-केज तालुक्यातील तांबवा येथील रहिवासी असलेले महाराष्ट्रातील लोककला शाहिरी आणि समाज प्रबोधनाच्या क्षेत्रामध्ये गेल्या ४५ वर्ष पासून सातत्याने कार्य करणारे जेष्ठ शाहीर तुकाराम गिनाजी ठोंबरे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२४ सालचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार मुंबई येथील रवींद्रनाथ टागोर नाट्य मंदिर या ठिकाणी हा पुरस्कार देण्यात आला ज्येष्ठ कलावंत शाहीर तुकाराम ठोंबरे पद्मिनी ताई तुकाराम ठोंबरे व छबुताई अंधारे हे हा पुरस्कार स्वीकारण्या करिता उपस्थित होते.

या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ व रोख रक्कम तीन लाख रुपये असे होते. हा पुरस्कार सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार व मुंबईचे पालकमंत्री यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला असंख्य कलावंताच्या पान २ वर

## बीड अंडर-१९ संघ रायगडला रवाना ; महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे इन्व्हिटेशन टूर्नामेंटला सुरुवात



बीड (प्रतिनिधी):-महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित अंडर-१९ इन्व्हिटेशन टूर्नामेंटला आज प्रारंभ झाला असून, या स्पर्धेत सहभागासाठी बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन चा अंडर-१९ संघ रायगडकडे रवाना झाला. या टूर्नामेंटमधील बीड संघाचे सामने रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर खेळवले जाणार आहेत.

संघाच्या प्रस्थानापूर्वी आयोजित कार्यक्रमात एचडीएफसी क्रिकेट क्लब आणि युनिक स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने निवड झालेल्या खेळाडूंना व्हाईट किट पान २ वर

CMYK